नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २८८ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. ०३ ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# ई-चलन न भरल्यास गाडी जप्त होणार!

## RC आणि PUC रिन्यूअलही होणार बंद; सर्वोच्च न्यायालयाचा कडक इशारा




नवी दिल्ली : (स. गांवकरी)

वाहतुकीचे नियम मोडून ई-चलनाचा दंड थकविणाऱ्या वाहनमालकांविरोधात सर्वोच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या ई-चलनांची वसुली करण्यासाठी रस्त्यावर अचानक तपासणी करून थकीत दंड असलेली वाहने जप्त करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने संबंधित प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना ई-चलनाच्या थकीत रकमेच्या वसुलीसाठी प्रभावी कारवाई करण्याचे निर्देश दिले. हे प्रकरण २०१२ मध्ये दाखल झालेल्या जनहित याचिकेशी संबंधित असून, सर्वोच्च न्यायालय त्यावर दीर्घकाळापासून देखरेख ठेवत आहे.

ॲमिनस क्युरीच्या अहवालानुसार, देशभरातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडे ई-चलनाच्या माध्यमातून सुमारे ४९ हजार १९४ कोटी रुपयांची रक्कम वसूल करणे बाकी आहे. त्यापैकी सुमारे २६ हजार १७५ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत.

ई-चलन प्रणालीद्वारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात दंड आकारला जात असला, तरी त्या दंडाची प्रत्यक्ष वसुली कितपत होते, हा प्रश्न यामुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. थकीत दंडाची प्रभावी वसुली करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून कारवाई करावी, असा स्पष्ट संदेश सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांतून मिळतो.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करून दंड न भरणे आता वाहनमालकांसाठी अधिक गंभीर ठरू शकते. त्यामुळे वाहनधारकांनी आपल्या वाहनावरील प्रलंबित ई-चलन तपासून त्याबाबतची कारवाई वेळेत पूर्ण करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### थकीत ई-चलन असल्यास कोणते निर्बंध?

- न्यायालयाच्या निर्देशांनुसार, दीर्घकाळ ई-चलन थकीत असलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यास सांगण्यात आले आहे—
- रस्त्यांवर अचानक तपासणी करून थकीत ई-चलन असलेली वाहने जप्त करणे.
- संबंधित वाहनांच्या ऑनलाइन सेवांवर निर्बंध आणणे.
- दंडाची रक्कम भरल्याशिवाय नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र आणि पत्ता बदल यांसारख्या सेवांवर निर्बंध.
- प्रलंबित ई-चलन निकाली निघेपर्यंत वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र रोखणे.
- वाहनाला वाहन पोर्टलवर प्रतिबंधित यादीत टाकणे.
- अशा वाहनांची विक्री अथवा मालकी हस्तांतरणावर निर्बंध.
- वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांच्या वाहनचालक परवान्याच्या नूतनीकरणावर कारवाई तसेच परवाना निलंबित करण्याची प्रक्रिया.
- थकीत ई-चलन असलेल्या वाहनांना प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र देण्यावरही निर्बंध.

# बॉक्सिंगमध्ये इतिहास! परवीन हुड्डाचा सुवर्ण पंच

## आशियाई स्पर्धेत भारताला मिळाले ७३ वे पदक



मुंबई : (स. गांवकरी)

जपानमध्ये सुरू असलेल्या 2026 च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आपला दबदबा कायम ठेवला आहे. महिला बॉक्सर परवीन हुड्डा हिने बॉक्सिंगमध्ये सुवर्ण पंच मारत इतिहास रचला आहे. महिलांच्या 65 किलो वजनी गटातील अंतिम सामन्यात परवीनने चिनी तैपेईच्या चेन निएन चिन हिचा 3-2 असा अटीतटीच्या लढतीत पराभव करत भारतासाठी सुवर्णपदक जिंकले. हे या स्पर्धेतील भारताचे 73 वे पदक ठरले आहे. परवीन हुड्डा ही आशियाई क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक पटकावणारी भारतातील तिसरी महिला बॉक्सर ठरली आहे. तिच्यापूर्वी 2014 मध्ये दिग्गज मुक्केबाज मेरी कोम हिने तर 2026 च्या याच स्पर्धेत लवलीना बोरगोहेन हिने सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला होता. लवलीना बोरगोहेनच्या सुवर्णपदकानंतर परवीनच्या रुपाने भारताला बॉक्सिंगमध्ये बॅक-टू-बॅक दुसरे सुवर्णपदक मिळाले आहे. शुक्रवारचा दिवस आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतासाठी अत्यंत यशस्वी ठरला. बॉक्सिंग व्यतिरिक्त तिरंदाजीतही भारतीय महिला संघाने इतिहास रचला आहे. भारतीय महिला तिरंदाजी संघाने दक्षिण कोरियाचे वर्चस्व संपवत आशियाई क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदाच सुवर्णपदक जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. तसेच मिक्स्ड रिकर्व्ह संघ आणि पुरुष रिकर्व्ह संघानेही चमकदार कामगिरी करत रौप्यपदक आपल्या नावे केले.

## थोडक्यात...

### पुण्यात ऑक्टोबर हीटची चाहूल

पुणे (स. गांवकरी) : पावसाळ्याने नुकताच निरोप घेतला असला तरी, आता पुण्यात 'ऑक्टोबर हीट'ची चाहूल लागली आहे. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीलाच शहर आणि परिसरातील कमाल आणि किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे केवळ दिवसाच नव्हे, तर रात्रीच्या उकाड्यातही वाढ झाल्याने पुणेकर हैराण झाले आहेत. शहरात शुक्रवारी (ता. २) सकाळपासून तापमानाचा पारा वाढला होता. नऊ-दहा वाजल्यापासूनच उन्हाचा चटका जाणवू लागला होता. त्यामुळे पावसाळा संपतो न संपतो तोच, नागरिकांना पुन्हा पंखे आणि वातानुकूलित (एसी) यंत्रणांचा आधार घ्यावा लागत असल्याचे चित्र शहरात आहे. गेल्या काही दिवसांपासून शहराचे कमाल तापमान ३० ते ३२ अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदले जात होते. मात्र शुक्रवारी शहरात कमाल तापमानात एक अंश सेल्सिअसने वाढ होऊन ते ३४ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २२.५ अंश सेल्सिअस नोंदले गेले. दिवसभर आकाश मुख्यतः निरभ्र होते, तर सायंकाळच्या सुमारास काही अंशी ढगाळ होते. दरम्यान, शनिवारी (ता. ३) उन्हाचा चटका आणखी वाढणार असून कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअसपर्यंत, तर किमान तापमान २२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. तसेच, आकाश मुख्यतः निरभ्र राहून दुपारनंतर किंवा सायंकाळी अंशतः ढगाळ वातावरण राहील, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे.

### आरोपीला कठोर शिक्षेची मागणी

पुणे (स. गांवकरी) : साडेचार वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेची शिवसेना नेत्या आणि 'स्त्री आधार केंद्र'च्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी पीडितेच्या पालकांशी दूरध्वनीवरून संवाद साधून, पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही दिली. स्त्री आधार केंद्राच्या कार्यकर्त्या अनिता शिंदे आणि राखी जाधव यांनी लोहगाव पोलिस ठाण्यात जाऊन तपासाची माहिती घेतली. तसेच पीडितेच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांना मानसिक धीर दिला. अशा संवेदनशील घटनांमध्ये कुटुंबाला एकटे न पाडता समुपदेशन, कायदेशीर मदत आणि सामाजिक आधार देणे अत्यंत गरजेचे असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले. या प्रकरणाचा निष्पक्ष आणि जलदगतीने तपास करून आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. पीडित कुटुंबाला पूर्ण न्याय मिळेपर्यंत संस्था पाठपुरावा करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### गे डेटिंग ॲपवरून तरुणाला लुटले

पुणे (स. गांवकरी) : गे डेटिंग ॲपच्या माध्यमातून मैत्री करून एका तरुणाला निर्जन ठिकाणी बोलावून बेदम मारहाण करत लुटल्याची घटना येरवडा परिसरात घडली. याप्रकरणी संबंधित तरुणाने (वय-२२, रा. भोसरी) विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी देवेंद्र, अरबाज आणि त्यांच्या एका साथीदाराविरोधात गुरुवारी (ता. १) गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार तरुणाला एका मुलाने डेटिंग ॲपवरून भेटण्यासाठी मेंटल हॉस्पिटल कॉर्नर येथे बोलावले. फिर्यादी तरुण तेथे पोहोचल्यानंतर आरोपींनी त्यांना पडक्या वसाहतीतील खोलीत नेले. त्या ठिकाणी तिघांनी फिर्यादी तरुणाला शिवीगाळ करत जबर मारहाण केली. त्यानंतर धमकावून त्याच्या मोबाइलमधील 'फोन पे'चा पासवर्ड मिळवून बँक खात्यातून २० हजार रुपये काढून घेतले. या प्रकाराची वाच्यता पोलिसांत केल्यास जिवे मारण्याची धमकी आरोपींनी दिली.

# गुजरातमध्ये समान नागरी कायदा लागू करण्यास राष्ट्रपतींची मंजुरी

मुंबई : (स. गांवकरी)



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुजरातमधील समान नागरी कायदा विधेयकाला अधिकृत मंजुरी दिली आहे. उत्तराखंडनंतर समान नागरी कायदा लागू करण्यास मंजुरी मिळवणारे गुजरात हे देशातील दुसरे राज्य ठरले आहे. राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाल्यानंतर आता गुजरात सरकार या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी लवकरच सविस्तर नियमावली जाहीर करणार आहे. त्यानंतर हा कायदा संपूर्ण राज्यात अधिकृतपणे लागू केला जाईल. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी या कायद्याचे स्वागत करताना म्हटलं की, समान नागरी कायदा हा राज्यातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क देणारा आहे. हे विधेयक गुजरातच्या माता-भगिनी आणि मुलींच्या कल्याणासाठी आणले गेले आहे. यूसीसीच्या माध्यमातून गुजरातने 'विकसित भारत २०४७' च्या उद्दिष्टाला गती देण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे. हा कायदा कोणत्याही समुदायाशी भेदभाव करत नाही, तसेच कोणाचेही मूलभूत अधिकार अथवा स्वातंत्र्य हिरावून घेत नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. विरोधकांनी या कायद्याला कडाडून विरोध दर्शवला असून हा कायदा मुस्लिमविरोधी असल्याचा आरोप केला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून सत्ताधारी भाजपने राजकीय फायद्यासाठी आणि अँटी-इन्कम्बन्सी रोखण्यासाठी हे विधेयक घाईघाईने मंजूर केल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला.

# शिष्टमंडळाच्या परस्पर निर्णयाने विद्यार्थ्यांमध्ये संताप

पुणे : (स. गांवकरी)



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभाराविरोधात आणि विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनातच फूट पडली असल्याचे चित्र आहे. मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य झाल्याने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, मुंबईला गेलेल्या शिष्टमंडळाने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांशी चर्चा न करता निर्णय घेतल्याचा आरोप करत एका गटाने आंदोलन पुन्हा सुरू केले. त्यामुळे शुक्रवारी शहरात दोन ठिकाणी स्वतंत्र आंदोलने सुरू झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाची मंत्रालयात बैठक झाली होती. या बैठकीत एमपीएससीच्या सचिवांची बदली तसेच आयोगाच्या अध्यक्षांची न्यायाधीशांमार्फत चौकशी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे २ ऑक्टोबरचे 'सत्याग्रह' आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याची घोषणा विद्यार्थी प्रतिनिधींनी केली होती. मात्र, विद्यार्थ्यांची मुख्य मागणी अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्याची असताना, शिष्टमंडळाने तडजोड का केली? असा संतप्त सवाल विद्यार्थ्यांनी उपस्थित केला. मुंबईला गेलेल्या शिष्टमंडळाने आंदोलनातील सर्व विद्यार्थ्यांशी चर्चा केली नाही. तसेच त्यांना विश्वासात न घेता आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचा आरोप आंदोलकांनी केला. 'आमचे आंदोलन विद्यार्थ्यांचे असून, आम्हाला राजकारण नको आहे. आमच्याशी चर्चा न करता निर्णय घेण्यात आला. आम्हाला अंधारात ठेवण्यात आले,' अशी भूमिका विद्यार्थ्यांनी मांडली.

सध्या शास्त्री रस्ता येथे एका गटाचे, तर नवी पेठेतील एस. एम. जोशी पुल येथे दुसऱ्या गटाचे आंदोलन सुरू आहे. दोन्ही ठिकाणी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी आहे. दरम्यान, आंदोलनाच्या दोन्ही गटांना विविध राजकीय नेत्यांनी भेटी देऊन पाठिंबा दर्शविला. शास्त्री रस्ता येथील विद्यार्थ्यांची आमदार धनंजय मुंडे यांनी भेट घेतली. तर एस. एम. जोशी पुलावरील आंदोलनाला खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, विश्वजीत कदम आणि रविकांत तुपकर यांनी भेट दिली.

# 'साहेब, शेतकऱ्यांना भरीव मदत द्या, जनावरांसाठी चारा द्या'

## वरुडीतील शेतकऱ्यांची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे आर्जवी मागणी

बदनापूर : (स. गांवकरी)



'साहेब, कष्टाने पिकवलेले पीक दुष्काळाने हिरावून नेले. आता साल कसे काढावे, लेकरांचे शिक्षण, आजारपणाचा खर्च आणि जनावरांसाठी चारा-पाणी कसे करावे,' अशी व्यथा मांडत वरुडी (ता. बदनापूर) येथील शेतकऱ्यांनी हेक्टरी एक लाख रुपयांची भरीव मदत देण्याची मागणी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. शेतकऱ्यांना दुष्काळातून बाहेर काढण्यासाठी शासन आवश्यक उपाययोजना करीत असून, सरकार खंबीरपणे त्यांच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही बावनकुळे यांनी शुक्रवारी (ता. दोन) दिली. वरुडी येथील राजू सांडू भिसे यांच्या शेतातील पावसाअभावी वाळलेल्या सोयाबीन पिकाची बावनकुळे यांनी पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांनी दुष्काळाची दाहकता त्यांच्या निदर्शनास आणून दिली. हरिश्चंद्र शिंदे यांनी खरीप पिकांसाठी झालेला खर्च, अत्यल्प पावसामुळे झालेली हानी आणि आगामी वर्षभरातील आर्थिक अडचणींची माहिती दिली. 'माणसांचे हाल होतीलच, मात्र मुक्या जनावरांच्या चारा-पाण्याचे काय?' असा प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला. गणेश कोल्हे यांनी मेंढपाळांच्या अडचणी मांडत त्यांच्या खात्यावर थेट चारा-पाण्यासाठी निधी जमा करण्याची मागणी केली. बावनकुळे म्हणाले, जालना जिल्ह्यासह अन्य भागांत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी करीत आहे. सोयाबीनचे मोठे नुकसान झाले असून तूर आणि कापूसही शेवटच्या घटकेला आहेत. पाण्याअभावी फळबागांवरही संकट आले आहे. दुष्काळी उपाययोजनांसाठी राज्यातील ११ विभागांच्या माध्यमातून नियोजन सुरू आहे. नाले सरळीकरण, शेतरस्ते, बंधारे बांधणे व दुरुस्ती, तसेच रोजगार हमीच्या कामांना प्राधान्य दिले जाईल.

गावातील पाणी गावात, शिवारातील पाणी शिवारात आणि शेतातील पाणी शेतात जिरविण्याची व्यवस्था करण्यावर भर दिला जाईल. वैरण विकास कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायतींना चारा उत्पादनासाठी अनुदान देण्यात येईल. गरज भासल्यास बाहेरील राज्यांतूनही चारा आणला जाईल. महसूल विभागाच्या जमिनीवर चारा लागवडीसाठी महिला बचत गटांना पाच एकर जागा व एक लाख रुपये अनुदान देण्याचा विचार आहे, असे त्यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे सांगून बावनकुळे म्हणाले की, राज्यातील २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाले आहेत. नुकसानीचे पंचनामे महत्त्वाचे असून त्यावर केंद्राच्या मदतीचे निकष अवलंबून आहेत. पंचनाम्यांसोबत उपग्रह सर्वेक्षण, ड्रोन इमेजिंग व गुगल मॅपिंगद्वारेही नुकसानीची नोंद केली जाईल. केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्याच्या तिजोरीतून तत्काळ मदत करण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने बँका, जिल्हा बँका, पतसंस्था व खासगी बँकांना शेती कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांना फोन न करण्याच्या सूचना दिल्या असून, त्याचे उल्लंघन झाल्यास गुन्हे दाखल केले जातील. खासगी सावकारांकडून त्रास झाल्यास फोडून काढू असा इशाराही त्यांनी दिला. चारा उपलब्धतेनुसार तालुक्यांचे वर्गीकरण करण्यात आले असून, वैरण विकास योजनेसाठी १० ते २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# दारूच्या नशेत पकडली ठाण्यात पोलिसाची कॉलर



नागपूर : (स. गांवकरी)

दारूच्या नशेत खासगी ट्रॅव्हल्समधून प्रवास करणाऱ्या प्रवाशाने गुरुवारी (ता. १) रात्री आठ वाजता भोले पेट्रोलपंप चौकात दारुच्या नशेत महिलांशी वाद घातल्यावर त्याला पोलिस ठाण्यात आणले. यावेळी ठाण्यात कर्मचाऱ्यांशीही हुज्जत घालत धक्काबुक्की करीत एका पोलिसाची कॉलर पकडून त्याचा गळा दाबण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी सीताबर्डी पोलिसांनी आरोपीला अटक केली. नसनीश कुमार तिवारी (वय-३६, रा. छत्तीसगड) असे अटक करण्यात आलेल्या प्रवाशाचे नाव आहे. गुरुवारी (ता.१) रात्री सुमारे आठच्या सुमारास खासगी ट्रॅव्हल्सची बस भोले पेट्रोलपंप चौकात आली. तिवारी याने प्रवासादरम्यान दारूचे सेवन केले होते. यावेळी त्याने बसमधून उतरल्यानंतर महिला प्रवाशांसमोर लघुशंका करण्यास सुरुवात केली. यामुळे महिलांनी त्याला विरोध केला. मात्र, त्याने महिलांशी वाद घालून त्यांना अश्लिल शिविगाळ करण्यास सुरुवात केली. त्यामुळे परिसरात मोठा गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळताच सीताबर्डी पोलिस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी तिवारी याला समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने पोलिसांशीही वाद घालण्यास सुरुवात केली. त्याला पोलिस ठाण्यात आणल्यानंतरही त्याने गोंधळ घातला. पोलिसांच्या माहितीनुसार, त्याने पोलिस अधिकारी सय्यद अहमद मुगल यांच्याशी शिवीगाळ केली. तसेच एका पोलिस कर्मचाऱ्याची कॉलर पकडून त्याचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी सीताबर्डी पोलिसांनी सरकारी कामात अडथळा निर्माण करण्यासह अन्य संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करून तिवारीला अटक केली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
— संपादकीय —



**डॉ. विश्वासराव आरोटे**
संपादक - दै. समर्थ गांवकरी

# गुन्हेगारीला आळा घालणार कोण?



**शहराचा विकास होत असताना रस्ते रुंदावतात, उंच इमारती उभ्या राहतात, नवनवीन सुविधा उपलब्ध होतात; मात्र या विकासाच्या सावलीत गुन्हेगारीचे सावट गडद होत असेल, तर त्या विकासाच्या दिशेचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे. चोरी, लूटमार, फसवणूक, मारामाऱ्या, महिलांविरोधातील गुन्हे, अमली पदार्थांची विक्री, सायबर गुन्हे आणि संघटित गुन्हेगारी यांसारख्या घटनांनी नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.**

गुन्हा घडल्यानंतर पोलिसांनी आरोपीला पकडणे ही कायदा-सुव्यवस्थेची आवश्यक बाब आहे; पण त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे गुन्हा घडण्यापूर्वी तो रोखणे. प्रतिबंधात्मक पोलिसिंग, संवेदनशील भागांमध्ये प्रभावी गस्त, सीसीटीव्ही यंत्रणेचा योग्य वापर, संशयास्पद हालचालींवर लक्ष आणि नागरिकांशी सातत्याने संवाद या बाबींना अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे. आज गुन्हेगारीचे स्वरूपही बदलले आहे. पूर्वी एखाद्या व्यक्तीला प्रत्यक्ष भेटून फसवणूक केली जात होती; आता मोबाईल, बनावट संकेतस्थळे, सामाजिक माध्यमे आणि विविध डिजिटल माध्यमांचा वापर करून काही क्षणांत आर्थिक फसवणूक केली जाते. त्यामुळे पारंपरिक पोलिसिंगसोबत तांत्रिकदृष्ट्याही सक्षम यंत्रणा उभी राहणे गरजेचे आहे. गुन्हेगारी वाढण्यामागे केवळ पोलिस यंत्रणेला जबाबदार धरून प्रश्न सुटणार नाही. कुटुंबव्यवस्था, तरुणांमध्ये वाढणारे व्यसन, बेरोजगारी, पैशांची लालसा, चुकीच्या संगतीचा प्रभाव, सामाजिक माध्यमांचा गैरवापर आणि गुन्हेगारीला मिळणारे स्थानिक पाठबळ या अनेक घटकांचाही विचार करावा लागेल. विशेषतः अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होऊ नये यासाठी पालक, शाळा, महाविद्यालये आणि समाज यांनी अधिक जागरूक राहणे आवश्यक आहे.

गुन्हेगारीविरोधातील लढाई ही केवळ पोलिसांची जबाबदारी नाही. नागरिकांनीही संशयास्पद घटना किंवा हालचालींची माहिती वेळेवर प्रशासनाला देणे, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवणे, अफवांवर विश्वास न ठेवणे आणि कायदा हातात न घेणे आवश्यक आहे. एखाद्या घटनेनंतर समाजमाध्यमांवर अपूर्ण किंवा खोटी माहिती पसरविणे हे परिस्थिती अधिक गंभीर करू शकते. तितकेच महत्त्वाचे म्हणजे गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाची गुणवत्ता आणि न्यायप्रक्रियेतील सातत्य. आरोपीला अटक झाली म्हणजे प्रकरण संपले असे नाही. तपास भक्कम असणे, पुरावे सुरक्षित ठेवणे आणि न्यायालयीन प्रक्रियेला आवश्यक सहकार्य मिळणे हीदेखील तितकीच महत्त्वाची साखळी आहे.

शहर सुरक्षित ठेवायचे असेल तर केवळ पोलिसांची संख्या वाढवून उपयोग नाही; पोलिस यंत्रणेला आधुनिक साधने, पुरेसे मनुष्यबळ, प्रशिक्षण आणि नागरिकांचा विश्वास देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर गुन्हेगारीला पोषक ठरणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक कारणांवरही काम करावे लागेल.

गुन्हेगारीविरोधातील लढाई ही एका दिवसाची मोहीम नाही. ती सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. नागरिकांना रात्री घराबाहेर पडताना, महिलांना निर्भयपणे प्रवास करताना, मुलांना शाळेत पाठवताना आणि ज्येष्ठांना सार्वजनिक ठिकाणी वावरताना सुरक्षित वाटणे हीच कोणत्याही शहराच्या प्रशासनाची खरी कसोटी आहे.

कायद्याची भीती आणि नागरिकांचा विश्वास या दोन्हींची सांगड घातल्याशिवाय गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवता येणार नाही. आता प्रश्न फक्त 'गुन्हा घडल्यानंतर कारवाई कोण करणार?' एवढाच नसून, 'गुन्हा घडूच नये यासाठी व्यवस्था काय करणार?' हा आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## महायुतीत रामदास आठवले आक्रमक! 'आम्हालाही सत्तेत वाटा द्या

अहिल्यानगर (स. गांवकरी) : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गटाचे प्रमुख आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी महाराष्ट्रातील महायुती सरकारमधील आरपीआयच्या दुर्लक्षावरून अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. आम्ही गेल्या १४ वर्षांपासून भाजप-शिवसेनेसोबत आहोत, मात्र तरीही महाराष्ट्राच्या सत्तेत आमच्या पक्षाला हवा तसा वाटा मिळत नाही, अशा शब्दांत आठवलेंनी आपली उघड नाराजी व्यक्त केली आहे. पत्रकारांशी बोलताना रामदास आठवले म्हणाले की, "मला केंद्रात मंत्रिपद मिळाले ही वेगळी गोष्ट आहे, पण ज्या कार्यकर्त्यांनी मला मंत्री केले, त्या रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनाही महाराष्ट्रात सत्तेचा वाटा मिळाला पाहिजे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या काळात आम्हाला सोबत नक्कीच मिळाली होती, परंतु सध्याच्या काळात मित्रपक्ष म्हणून आम्हाला गृहीत धरलं जात आहे. भाजप आणि शिवसेनेसोबत असूनही पक्षाला एकही मंत्रिपद महाराष्ट्रात मिळालेले नसल्याचं आठवले यांनी म्हटलंय.. तसेच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या भूमिकेवर बोलताना आठवले म्हणाले, आम्ही केवळ भाजपच्या कोट्यात आहोत असे समजणे चुकीचे आहे. रिपब्लिकन पक्ष हा महायुतीचा एक स्वतंत्र आणि महत्त्वाचा घटक पक्ष आहे." २०१२ मधील बाळासाहेब ठाकरेंच्या आठवणीला उजाळा देत आठवले म्हणाले, "शिवशक्ती आणि भीमशक्ती एकत्र आली तर महाराष्ट्रात मोठे सामाजिक परिवर्तन घडेल, असा विश्वास बाळासाहेबांनी व्यक्त केला होता. त्यामुळे आमचा सन्मान झालाच पाहिजे असली आठवले म्हणालेत.




## घोडेगाव ग्रामपंचायतीत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी

घोडेगाव (स. गांवकरी) : जगाला सत्य, अहिंसा आणि सहिष्णुतेची शिकवण देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच भारताचे माजी पंतप्रधान आणि भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त घोडेगाव ग्रामपंचायतीच्या वतीने दोन्ही महान नेत्यांना विनम्र अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी घोडेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच स्वप्नील घोडेकर यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि शांततेच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. समाजात सलोखा, बंधुभाव आणि एकता टिकवून ठेवण्यासाठी गांधीजींच्या विचारांचे आचरण करणे आवश्यक आहे. तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा आणि देशसेवेच्या कार्यातून प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी, असे मत त्यांनी व्यक्त केले. माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य सुनील इंदोरे यांनी आपल्या मनोगतात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांचे विचार आजच्या काळातही तितकेच प्रेरणादायी असल्याचे सांगितले. सत्य, अहिंसा, सहिष्णुता आणि सामाजिक एकोपा ही मूल्ये केवळ जयंतीपुरती मर्यादित न ठेवता दैनंदिन जीवनात अंगीकारली पाहिजेत. ग्रामविकास साधताना सर्वांना सोबत घेऊन पारदर्शकता आणि प्रामाणिकपणाने काम करणे हीच या महान नेत्यांना खरी आदरांजली ठरेल, असे त्यांनी नमूद केले. महात्मा गांधी यांचा सत्य व अहिंसेचा मार्ग आणि लालबहादूर शास्त्री यांचा 'जय जवान, जय किसान' हा राष्ट्रप्रेरक संदेश नव्या पिढीसाठी सदैव मार्गदर्शक राहील, असे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमास माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य कपिल सोमवंशी, ग्रामपंचायत सदस्य नंदा काळे,आबू काठेवाडी, वरिष्ठ लिपिक कैलास डोके, तान्हाजी काळे, किशोर डोंगरे उपस्थित होते.

## दिवेआगर दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आज आळंदी बंद



आळंदी (स. गांवकरी) : रायगड जिल्ह्यातील दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर भरतीचा व खोल पाण्याचा अंदाज न आल्याने पुण्यातील 'विनर्स अकॅडमी फॉर ११th अँड १२th' या कोचिंग क्लासच्या आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या हृदयद्रावक आणि अत्यंत वेदनादायी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आज आळंदी शहर व परिसर पूर्णपणे बंद ठेवण्यात आला होता. महाद्वार चौक, भराव रस्ता बाजारपेठ, वडगाव रस्ता, मरकळ रोड, प्रदक्षिणा मार्ग, नगरपालिका चौक, शिवतेज चौक, इंद्रायणी नदी घाट परिसर आणि चाकण चौक येथील सर्व व्यापारी, व्यावसायिक, संस्था आणि नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने आपापली दुकाने व व्यवसाय बंद ठेवून शोकाकुल कुटुंबांच्या दुःखात सहभाग नोंदवला. घटनेची माहिती मिळताच काल रात्रीपासून विनर्स अकॅडमी येथे आणि आज पहाटेपासूनच आळंदी पोलीस ठाण्यामध्ये सहलीला गेलेल्या विद्यार्थ्यांचे नातेवाईक, ग्रामस्थ आणि मित्रपरिवाराने मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. दिवेआगर येथून गुरुवारी रात्री उशिरा निघालेली सहलीची बस आज शुक्रवारी सकाळी आळंदीत पोहोचली. बस दाखल होताच आणि विद्यार्थ्यांचे मृतदेह एकापाठोपाठ एक आळंदीत आणले जात असताना उपस्थित सर्वांचाच धीर सुटला. अनेक नागरिक आणि मित्र मयत विद्यार्थ्यांच्या आठवणी सांगताना सर्वांच्याच डोळ्यातून अश्रूधारा वाहत होत्या. केळगाव व आळंदी परिसरात आज सकाळी क्रमाक्रमाने रुग्णवाहिकांमधून मयत विद्यार्थ्यांचे मृतदेह आणण्यात आले. यातील केळगाव येथील २ आणि आळंदी येथील २ अशा एकूण ४ विद्यार्थ्यांवर सकाळी १० वाजेच्या सुमारास अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यविधीसाठी आळंदी आणि परिसरातील हजारो नागरिक उपस्थित होते. निष्पाप ८ मुलांच्या अशा अकाली जाण्याने संपूर्ण आळंदी परिसर शोकसागरात बुडाला आहे.

# "महा" संस्कृतीचा डंका निश्चित वाजवा; मात्र लोककलावंत उपाशी मारू नका!

(स. गांवकरी)





- ले . खंडूराज शं. गायकवाड
- Khandurajgkwd @gmail. Com
- (लेखक मंत्रालयातील जेष्ठ पत्रकार, लोककला व सांस्कृतिक विषयांचे अभ्यासक आहेत.)

महाराष्ट्राच्या मातीला संस्कृतीचा समृद्ध वारसा लाभला आहे. संतपरंपरा, लोकपरंपरा, लोककला आणि लोकजीवनाच्या असंख्य रंगांनी महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख देशाच्या सीमा ओलांडून जगभर पोहोचविली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या या सांस्कृतिक वैभवाचा डंका देशविदेशात वाजला पाहिजे, यात दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, हा डंका वाजविताना ज्या मातीने ही संस्कृती जपली, ज्या कलाकारांनी आपल्या घुंगरांच्या नादातून, ढोलकीच्या ठेक्यातून, शाहिरीच्या शब्दांतून आणि लोकपरंपरेच्या सादरीकरणातून ती जिवंत ठेवली, त्या पारंपरिक लोककलावंतांचा आवाज मात्र दडपला जाऊ नये, ही काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे व्यापक सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व लक्षात घेऊन सांस्कृतिक कार्य विभागाने सार्वजनिक गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून दरवर्षी आयोजित करण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. त्याच अनुषंगाने यंदा राज्यभर, राज्याबाहेर तसेच देश-विदेशात मोठ्या दिमाखात 'लोककलेतील श्रीगणेशा' हा सोहळा साजरा करण्यात आला. विविध ठिकाणी महाराष्ट्राच्या लोककलेचे अप्रतिम सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या लोककलेची ही रंगत विविध राज्यांतील तसेच परदेशातील रसिकांना अनुभवता येणे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

या वर्षभरात नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, तेलंगणा, छत्तीसगड, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, दादरा-नगर हवेली, हरियाणा, तामिळनाडू आदी विविध ठिकाणी महाराष्ट्राच्या लोककलेचा 'श्रीगणेशा' झाला. आदिवासी नृत्य, नमन, बाल्या नृत्य, जागरण-गोंधळ, धनगरी नृत्य, शाहिरी, लावणी, ओवी, मंगळागौर, भजन अशा विविध लोककलाविष्कारांनी महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे बहुरंगी रूप रसिकांसमोर उभे केले.

महाराष्ट्रातही बैलपोळ्याच्या कृषिसंस्कृतीपासून ते 'मोगरा फुलला' या आध्यात्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांपर्यंत विविध उपक्रम सांस्कृतिक कार्य संचालनालयाने सुंदर पद्धतीने आयोजित केले. अहिल्यानगर, धाराशिव, नाशिक, सोलापूर, पुणे, मुंबई, ठाणे आदी ठिकाणी 'लोककलेचा श्रीगणेशा' मोठ्या दिमाखात पार पडला. त्याचबरोबर संगीत नाटक, शास्त्रीय संगीत, संगीत रजनी अशा अभिजात कलांनाही व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. याबद्दल सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री आशिष शेलार यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. गेली अनेक वर्षे सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या माध्यमातून कार्यक्रमांचा हा सांस्कृतिक झंझावात सुरू आहे. विशेष म्हणजे कार्यालयातील केवळ ३०-३२ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या तोकड्या मनुष्यबळावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक सोहळे आयोजित करणे ही निश्चितच सोपी बाब नाही. उपलब्ध मनुष्यबळ आणि साधनसामग्रीच्या मर्यादा असूनही अधिकारी-कर्मचारी ओढाताण करून कार्यक्रम यशस्वी करून दाखवितात. त्यांच्या या प्रयत्नांचे कौतुक करायलाच हवे.

मात्र, या कार्यक्रमांच्या रेलचेलीमध्ये कुठेतरी पारंपरिक लोककलावंत हरवून तर जात नाही ना? असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. आजही महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील असंख्य लोककलावंत कोणत्याही मोठ्या अपेक्षेशिवाय आपल्या लोककलेची प्रामाणिकपणे सेवा करीत आहेत. त्यांच्या कलेत व्यावसायिक झगमगाट नसेल; प्रसिद्धीची मोठी हाव नसेल; पण त्यांच्या कलेत मातीचा गंध आहे, परंपरेची ऊब आहे आणि पिढ्यान्‌पिढ्यांची साधना आहे. त्यांची एकच अपेक्षा आहे—'सरकार मायबापांनी आमची दखल घ्यावी!' मग सांस्कृतिक कार्य संचालनालय देश-विदेशात महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव पोहोचवीत असेल, तर या वैभवाचा खरा वारसा जपणाऱ्या पारंपरिक लोककलावंतांना अधिकृत कार्यक्रमांमध्ये व्यासपीठ देण्यात अडचण काय? संचालनालयाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्या यंत्रणेने पारंपरिक लोककलावंतांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया अधिक व्यापक करण्याची गरज आहे. अन्यथा सरकारी रंगमंचावर पारंपरिक लोककलावंतांच्या जागी केवळ कृत्रिमरीत्या सादर केलेले 'आर्टिफिशियल आर्टिस्ट'चे कार्यक्रम वाढत गेले, तर त्याला 'लोककलेचा श्रीगणेशा' म्हणायचे तरी कसे?

लोककला ही केवळ मनोरंजनाची वस्तू नाही. ती महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा आरसा आहे. ती गावकुसाबाहेरच्या माणसाचे सुख-दुःख सांगते. ती पिढ्यांच्या स्मृती जपते. ती बोलीभाषा, परंपरा, श्रद्धा, सामाजिक जाणिवा आणि मातीतली अस्मिता पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवते. त्यामुळे लोककलेचा उत्सव साजरा करताना लोककलावंत केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे.

सरकारच्या रंगमंचावर जातिवंत लोककलावंत दिसला पाहिजे. त्याच्या घुंगरांचा नाद ऐकू आला पाहिजे. त्याच्या ढोलकीचा ठेका महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची साक्ष देत राहिला पाहिजे. शाहिराच्या शब्दांतून महाराष्ट्राचा इतिहास दुमदुमला पाहिजे. लावणीच्या अदाकारीतून, भारुडाच्या प्रबोधनातून, गोंधळ-जागरणाच्या परंपरेतून आणि धनगरी नृत्याच्या ठेक्यातून महाराष्ट्राची अस्सल माती रंगमंचावर उतरली पाहिजे. हीच आज राज्यातील पारंपरिक लोककलावंतांची अपेक्षा आहे. स्मृतीशेष कलावंतांच्या स्मृतींनाही व्यासपीठ मिळू द्या!

गेल्या दोन वर्षांपासून जुन्या-जाणत्या लोककलावंतांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयाने विविध जिल्ह्यांमध्ये 'स्मृतीशेष' या स्वरूपाचे छोटे पण आशयघन कार्यक्रम आयोजित करण्याचा चांगला निर्णय घेतला होता. काळाच्या पडद्याआड गेलेल्या कलावंतांच्या कर्तृत्वाला अभिवादन करण्याची आणि नव्या पिढीला त्यांच्या कार्याची ओळख करून देण्याची ही सुंदर संकल्पना होती.

मात्र, या संदर्भातील शासन निर्णयच मंत्रालयातील सांस्कृतिक विभागातील कोणत्या अधिकाऱ्याच्या स्तरावर अडवून ठेवण्यात आला आहे, अशी चर्चा आहे. जर ही बाब वस्तुस्थिती असेल, तर अशा निर्णयांना प्रशासकीय अडथळ्यांच्या चौकटीत अडकवून न ठेवता त्यांना गती देण्याची आवश्यकता आहे. कारण ज्या कलावंतांनी आपले आयुष्य लोककलेच्या सेवेसाठी वाहून घेतले, त्यांच्या स्मृती जपणे ही केवळ सांस्कृतिक जबाबदारी नसून कृतज्ञतेचीही भावना आहे.

महाराष्ट्राच्या संस्कृतीचा डंका देश-विदेशात निश्चितच वाजवा; महासंस्कृतीचे वैभव जगाला दाखवा. पण हा डंका वाजविताना त्या डंकेची कातडी तयार करणाऱ्या, त्यावर ठेका धरणाऱ्या आणि पिढ्यान्‌पिढ्या महाराष्ट्राची लोकसंस्कृती जिवंत ठेवणाऱ्या लोककलावंतांचा आवाज मात्र हरवू देऊ नका.

**कारण लोककला जगली, तरच लोकसंस्कृती जगेल; आणि लोककलावंत जगला, तरच महाराष्ट्राच्या महासंस्कृतीचा खरा डंका दुमदुमत राहील.**

### नव्या संचालकांकडून मोठ्या अपेक्षा

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या संचालकपदी नुकतेच प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेले प्रशांत खेडेकर रुजू झाले आहेत. संचालनालयाच्या कामाचा संपूर्ण आवाका आणि त्यातील विविध स्तर त्यांना समजून घेण्यासाठी निश्चितच काही काळ जाईल. मात्र, महाराष्ट्रातील तमाम लोककलावंतांच्या त्यांच्या कडून मोठ्या अपेक्षा आहेत. पारंपरिक लोककलावंतांना त्यांच्या कलेचे योग्य व्यासपीठ मिळावे, त्यांची शासनदरबारी नोंद व्हावी, त्यांना सन्मान आणि संधी मिळावी, त्यांच्या कलेचे दस्तऐवजीकरण व्हावे आणि लोककलेच्या नावाखाली होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये अस्सल लोककलावंतांना अग्रक्रम मिळावा, अशी अपेक्षा आहे.

# डॉग स्कॉडच्या पोलीस वाहनाचा भीषण अपघात

- दोन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी; श्वान 'शेरू' किरकोळ जखमी
- मृत्यूच्या दाढेतून पोलिसांचा बचाव; नांदेडला उपचारासाठी हलविले

तामसा : (स. गांवकरी)

चोरीच्या घटनेच्या तपासासाठी नांदेडहून तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कांडली येथे येत असलेल्या डॉग स्कॉडच्या पोलीस वाहनाला शुक्रवारी (दि. २ ऑक्टोबर) सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. पिंपराळा येथील नटराज जिनिंग अँड प्रेसिंग कारखान्याजवळील वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पोलीस वाहन रस्त्याच्या विरुद्ध दिशेला जाऊन सुमारे चार फूट खोल खड्डयात कोसळले. या दुर्घटनेत दोन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले, तर श्वानपथकातील 'शेरू' हा श्वानही किरकोळ जखमी झाला. मिळालेल्या माहितीनुसार, कांडली येथे चोरीची घटना घडल्याने तपासासाठी नांदेड येथून डॉग स्कॉडला पाचारण करण्यात आले होते. श्वानपथक घेऊन पोलीस वाहन कांडलीकडे जात असताना पिंपराळा परिसरातील धोकादायक वळणावर अचानक चालकाचे नियंत्रण सुटले. वाहन रस्त्याच्या खाली जाऊन खोल खड्डयात कोसळल्याने वाहनाचे मोठे नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळताच तामसा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर, पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप पाईकराव, वाहनचालक किरण डोरले, पोलीस कॉन्स्टेबल कुणाल लोखंडे व करण वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते संजय सोमेवाड, सुनील बोईनवाड, अमोल कंठाले, सचिन पवार यांनी जखमी यांना गाडीतून बाहेर काढून मदतकार्य केले. अपघातग्रस्त वाहनातून जखमी कर्मचाऱ्यांना बाहेर काढून तातडीने तामसा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. या अपघातात पोलीस वाहनचालक रमेश शिवाजी नागरगोजे (बक्कल क्र. २९९३) आणि श्वानतज्ज्ञ माधव देवाजी पल्लेवाड (बक्कल क्र. ३१६८) हे गंभीर जखमी झाले. वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिनी सूर्यवंशी यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी दोघांनाही नांदेड येथील विष्णुपुरी रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, या अपघातात डॉग स्कॉडमधील 'शेरू' हा श्वानही किरकोळ जखमी झाला. अपघातानंतर त्याला तामसा पोलीस ठाण्यात आणण्यात आले. पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश कबले व पोलीस कॉन्स्टेबल मुदशीर खान यांनी त्याची देखरेख करत त्याला अन्न-पाणी दिले. सध्या 'शेरू'ची प्रकृती सुरक्षित असल्याची माहिती आहे. तामसा पोलीस स्टेशनच्या अंतर्गत कांडली येथे दिनांक एक ऑक्टोबर रोजी रात्री साईनाथ बहिरवाड यांच्या राहता घरी रात्री अकरा ते पाच दरम्यान अज्ञात चोराने घरात घुसून घरातील कपाटात चे लोक फोडून नगदी 19 हजार रुपये व सोन्या चांदीचे दागिने लंपास केल्याची तामसा पोलीस ठाण्यात घटनेच्या माहिती मिळताच तामसा पोलीस यांनी संबंधित घटनेची माहिती श्वान पथक यांना दिले.




## दिलीप वळसे पाटील यांचे अभिवादन!



मंचर / पुणे : (स. गांवकरी)

महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी मंचर येथील जनसंपर्क कार्यालयात दोन्ही नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी महिला राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षा सुषमा शिंदे, युवक तालुकाध्यक्ष वैभव उंडे, बाजार समितीचे सभापती निलेश थोरात, पंचायत समितीचे माजी सभापती सुनील गवारी, निलेश टेमकर, मंचर नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष लक्ष्मण भक्ते-थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उपस्थितांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या विचारांना उजाळा दिला.

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई द्या

## पंचनामे करून NDRFच्या निकषानुसार मदत द्यावी आ. श्रीजया चव्हाण यांच्याकडे मागणी

अर्धापूर : (स. गांवकरी)



नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या केळी बागांचे महसूल विभागाने तातडीने पंचनामे करून NDRFच्या निकषानुसार दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी. अशी मागणी आ.श्रीजया चव्हाण यांच्याकडे दि.२ शुक्रवारी रोजी करण्यात आली. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने उभ्या केलेल्या केळी बागांना प्रतिकूल हवामानाचा मोठा फटका बसला आहे. ऐन उत्पादनाच्या काळात झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, नुकसानग्रस्त केळी बागांचे पंचनामे करून शासनाकडून मदत मिळवून देणे गरजेचे आहे. शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई मिळाल्यास संकटात सापडलेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळेल अशी मागणी आमदार श्रीजया चव्हाण यांच्याकडे केली आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ.वैशाली प्रवीण देशमुख, तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे,नगरसेवक राजेश्वर देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे,शेतकरी प्रल्हादराव माटे, संचालक व्यंकटराव साखरे,माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे,शहराध्यक्ष योगेश हळदे,सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरूराज रणखांब,तुकाराम माटे, विनोद पांडे,बाबुराव जाधव, शिवशंकर वाघमारे,ज्ञानेश्वर माटे यांच्या सह केळी उत्पादक शेतकऱ्यांची हि मागणी शासन स्तरावर पाठपुरावा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी निवेदनाद्वारे केली आहे. आ.श्रीजय चव्हाण यांनी शहरातील विविध भागात महात्मा गांधी जयंती निमित्त अर्धापूर शहरातील केशवराज मंदिरात साफसफाई करून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी शहरातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे



## अक्कलकोट शहराला नियमित पाणी पुरवठा करा अन्यथा पद मुक्त व्हा

अक्कलकोट (स. गांवकरी) : गेली दोन वर्षं झाली अक्कलकोट शहरातील जनतेला पंधरा ते वीस दिवसानी पाणी पुरवठा केला जात आहे म्हणजे च महिन्यात फक्त दोन वेळा आणि वर्षातून विस वेळा पाणी बिल मात्र वर्ष भराचे भरावे लागत आहे. असला अन्याय सहन केला जाणार नाही. असाही इशारा त्यांनी दिला आहे. पावसाळ्यात अशी परिस्थिती असेल तर येणाऱ्या उन्हाळ्यात काय होणार याचा विचार करा आणि शहारा ला नियमित पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करा अन्यथा शिवसेने च्या वतीने उग्र आंदोलन करण्यात येईल यावेळी जिल्हा प्रमुख शरणराज केंगनालकर शहर प्रमुख राम जाधव संघटक सोपान निकते महिला आघाडी प्रमुख प्रिया बसवंती. मोहम्मद मुलानी समीर नदाफ मुन्ना तांबोळी शरणपा माळी रोहित कुमार शंकर वाघमारे धनंजय देशपांडे श्रीकांत जाधव गणेश कांबळे केशटी सर राजेश पाटील इलाइ सय्यद आदि उपस्थित होते.



## पब्लिक स्कूलचे संस्थापक प्रा. विनोद पाटील यांना 'ठाणे गौरव' पुरस्कार

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा 'ठाणे गुणजन', 'ठाणे गौरव' आणि 'ठाणे भूषण' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये दिवा येथील पब्लिक स्कूलचे संस्थापक प्रा. विनोद मनोहर पाटील यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा 'ठाणे गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के, महापौर शर्मिला पिंपळकर तसेच नगरसेवक रमाकांत मढवी, दीपक जाधव आणि अर्चना पाटील यांच्या हस्ते प्रा. विनोद पाटील यांचा सन्मान करण्यात आला. दिवा आणि परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी तसेच आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची यावेळी दखल घेण्यात आली. पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रा. विनोद पाटील म्हणाले, "ठाणे महानगरपालिकेने माझ्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार दिल्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. हा सन्मान केवळ माझा नसून माझ्या संस्थेतील कष्टाळू शिक्षक, माझ्यावर विश्वास ठेवणारे पालक आणि मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा आहे. हा पुरस्कार भविष्यात आणखी जोमाने शैक्षणिक कार्य करण्याची प्रेरणा देईल." प्रा. विनोद पाटील यांना मिळालेल्या या सन्मानामुळे दिवा परिसरातील नागरिक, विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## वैशाली माडे फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप



भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील पिसे केंद्रातील जिल्हा परिषद मराठी शाळा, चिराडपाडा येथे वैशाली माडे फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळावी आणि शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून शाळेतील एकूण ७० विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून वैशाली माडे फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हैबती धेंडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिनेअभिनेते शिरीष पवार यांनी केले. यावेळी सुप्रसिद्ध गायिका वैशाली माडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांसाठी गाणे सादर करून कार्यक्रमात उत्साह निर्माण केला आणि शिक्षणाबाबत जनजागृती केली. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा ठाणे जिल्ह्याच्या वतीने ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे आणि जिल्हा सचिव कैलास ढमणे यांच्या हस्ते सुप्रसिद्ध गायिका वैशाली माडे यांना सन्मानचिन्ह देऊन विशेष सन्मानित करण्यात आले. यावेळी भगवान चंदे आणि हैबती धेंडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे, जिल्हा सचिव कैलास ढमणे, भावना ढमणे, पोलीस पाटील दीपक ढमणे, शाळेचे मुख्याध्यापक अविनाश सोनावणे, सहशिक्षिका नंदिनी पाटील, गोपाळ साळवे, गोरख अहिरे, विजयकुमार वाघ, सागर भोईर, अनंता तरणे, कमलेश जाधव, आदेश जाधव तर आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते कमलेश जाधव व पत्रकार कैलास ढमणे यांनी विशेष प्रयत्न केले.

## भारतीय ग्राहक पंचायत कळवण तालुका अध्यक्षपदी डॉ. अनिल महाजन



कळवण, जि. नाशिक (स. गांवकरी) : अखिल भारतीय ग्राहक पंचायत, कळवण तालुका, जिल्हा नाशिकची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. ग्राहकांचे हक्क, हित आणि संरक्षण यासाठी आली आहे. भूषण भास्कर पगार व दिनेश भास्कर अमृतकार यांची तालुका उपाध्यक्षपदी, सचीन प्रकाश सोनवणे यांची सचिवपदी, कृष्णकुमार कामळस्कर यांची सहसचिवपदी, निलेश प्रल्हाद दुसाने यांची कोषाध्यक्षपदी आणि मनिषा दिपक वेढणे यांची सहकोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच काशिनाथ राजाराम गुंजाळ, विशाल राजाराम गुंजाळ, मोतीराम कारभारी वाघ, अशोक पांडुरंग जाधव, योगेश दादाजी चव्हाण, दिलीप मुरलीधर अहिरराव, यश सुभाष देवघरे, सौ. स्मिता मधुकर खैरनार, चंद्रकांत दशरथ बुटे, महेश पंडित कोष्टी, भगवान विश्वनाथ सोनजे, दीपक काशिनाथ वेढणे, भूषण सुरेश देशमुख आणि प्रकाश काशिनाथ कडवे यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या माध्यमातून ग्राहकांना त्यांच्या हक्कांची माहिती व जागृती करून देणे, ग्राहकांची फसवणूक व अन्यायकारक व्यवहारांना आळा घालण्यासाठी प्रयत्न करणे, वस्तू व सेवांचा दर्जा, किंमत, गुणवत्ता आणि पारदर्शकता याबाबत ग्राहकांना मार्गदर्शन करणे, तसेच ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी योग्य मार्गदर्शन व सहकार्य करणे हा प्रमुख उद्देश आहे.

# ठाणे महापालिकेचा ४४ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

### 'ठाणे भूषण', 'ठाणे गौरव' आणि 'ठाणे गुणीजन' पुरस्कारांनी मान्यवरांचा गौरव



ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे महानगरपालिकेचा ४४ वा वर्धापन दिन गुरुवारी (१ ऑक्टोबर) राम गणेश गडकरी रंगायतन येथे उत्साहात साजरा करण्यात आला. शहराच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ठाणेकरांचा 'ठाणे भूषण', 'ठाणे गौरव' आणि 'ठाणे गुणीजन' पुरस्कारांनी गौरव करण्यात आला. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विविध मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की, "ठाणे शहराच्या विकासात महापालिकेबरोबरच ठाणेकर नागरिकांचेही मोठे योगदान आहे. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले नागरिक सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाजोपयोगी काम करतात. त्यांच्या कार्याचा सन्मान आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पुरस्कार आवश्यक आहेत. हा सन्मान त्या व्यक्तींबरोबरच संपूर्ण ठाणे शहराचा असतो." यावेळी त्यांनी महापालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विकासकामांचा आढावाही घेतला. पं. मुकुंद मराठे, पत्रकार एकनाथ बिरवटकर, आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू श्रीकांत वाड, चंद्रशेखर महाशब्दे, देविदास चाळके, संजीव ब्रह्मे, सदाशिव टेटविलकर, प्रकाश कोटवानी, अनिरुद्ध जोशी, सदाशिव कुलकर्णी, सुभाष मालेगांवकर आणि रामचंद्र चिमाजी जंगले यांना 'ठाणे भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच आशियाई स्पर्धेतील १० मीटर एअर रायफल नेमबाजी प्रकारात कांस्यपदक मिळविणाऱ्या रुद्रांश बाळासाहेब पाटील यांना 'ठाणे गौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले. याशिवाय 'ठाणे गौरव', 'ठाणे गुणीजन' तसेच कला आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास खासदार नरेश म्हस्के, आमदार रवींद्र फाटक, महापौर शर्मिला पिंपळोलकर, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, शिवसेना गटनेते पवन कदम, विविध प्रभाग समित्यांचे सभापती, ज्येष्ठ नगरसेवक, नगरसेविका तसेच महापालिका अधिकारी उपस्थित होते.



## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

आळेफाटा : (स. गांवकरी)

निमगाव सावा,ता.जुन्नर येथील श्री.पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि श्री पांडुरंग कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संदिपान पवार, सचिव परेश घोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रल्हाद शिंदे, प्रा.आकाश धुमाळ, प्रा. अनिल पडवळ, प्रा.सुभाष घोडे, श्रीमती पूजा थिगळे आणि श्री.शांताराम गाडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा, शांतता आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. त्यांचे विचार आजही संपूर्ण जगाला शांतता आणि मानवतेचा संदेश देतात. लालबहादूर शास्त्री यांनी साधेपणा, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेचा आदर्श समाजासमोर ठेवला. 'जय जवान, जय किसान' हा त्यांचा प्रेरणादायी नारा आजही देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

## गांधी जयंतीनिमित्त मोरव्हालमध्ये आरोग्य व स्वच्छतेचा जागर !

रावेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील मोरव्हाल, दि. २ ऑक्टोबर : दुर्गम भागातील मोरव्हाल येथे 'माझे गाव, आरोग्यसंपन्न गाव' या उपक्रमांतर्गत आयुष्मान आरोग्य मंदिर व प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विविध जनजागृतीपर व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. रावेर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अमोल भंगाळे, लोहारा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कीर्ती भामरे, डॉ. रिजवान शेख, आरोग्य सहाय्यक महेमुद तडवी, आरोग्य निरीक्षक डी. के. नमायते आणि समुदाय वैद्यकीय अधिकारी चेतन चिमणकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांना महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा, स्वच्छता व स्वावलंबनाच्या विचारांची, तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान, जय किसान' या संदेशाची माहिती देण्यात आली. आरोग्य सेवक योगेश कापडणे यांनी स्वच्छता अभियान, परिसर स्वच्छता, आरोग्यविषयक सवयी आणि वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. तसेच नागरिकांना स्वच्छता व आरोग्याची शपथ देण्यात आली. या उपक्रमात गावातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक आणि आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



## मुख्य निवडणुक आयुक्त ज्ञानेशकुमार यांना प्रतिकात्मक अटक

# सोलापुरात शिवसेनेचे आंदोलन

सोलापूर : (स. गांवकरी)

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने चार हुतात्मा चौक, सोलापूर येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या हुकूमशाही कारभाराविरुद्ध त्यांना प्रतिकात्मक अटक करून आंदोलन करण्यात आले व भव्य निदर्शने करण्यात आली.

SIR च्या माध्यमातून सुरू असलेल्या मतचोरीच्या विरोधात आणि लोकशाही वाचवण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण यांनी सांगितले. सोलापुरातून पेटलेली ही ठिणगी आता संपूर्ण देशभर पसरल्याशिवाय राहणार नाही, असे मत जिल्हाप्रमुख शरणराज केंगनाळकर यांनी व्यक्त केले. SIR च्या नावाखाली भाजपा आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे मतचोरी करत असून भ्रष्ट ज्ञानेश कुमार यांना तात्काळ अटक झालीच पाहिजे,अशी मागणी महानगरप्रमुख महेश धाराशिवकर यांनी केली.



यावेळी भारताचा तिरंगा झेंडा हातात घेऊन व ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील पोस्टर्स झळकावत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. परिसर घोषणांनी दणाणून गेला होता. या आंदोलनात जिल्हा सहसंपर्कप्रमुख दत्ता माने, लोकसभा प्रमुख संजय पौळ, जिल्हा प्रवक्ता अतुल भंवर, विधानसभा प्रमुख निरंजन बोदुल ,महिला आघाडीच्या मंगल थोरात, प्रिया बसवंती, विष्णू कारमपुरी, युवा सेना जिल्हा प्रमुख रमेश चौगुले,युवा सेना प्रमुख राम वाकसे, तुषार अवताडे, संदीप बेळमकर,महम्मद मुलानी,चंद्रकांत मानवी, रमेश चौगुले, राजाभाऊ कुसेकर, योगेश सलगर,विजय पुकाळे,अनिल जाधव, समर्थ गायकवाड जरगिस मुल्ला,दत्ता खलाटे,गेनसिद्ध काटकर,अजय खांडेकर, प्रकाश पवार, संगण्णा कोरे,संतोष टोणपे,ॲड.चौधरी , दिगंबर मल्लाव, राहुल दशवंत,उदय पवार,धर्मराज केंगनाळकर यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसेना, युवासेना व महिला आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नाशिक रिंगरोड बाधित शेतकऱ्यांची 'वर्षा'वर बैठक

### पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीने निर्णय; शेतकऱ्यांच्या मागण्यांवर पुराव्यानिशी चर्चा होणार – करण गायकर

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक रिंगरोड बाधित शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या आणि भूसंपादनातील गंभीर समस्यांवर तोडगा काढण्यासाठी उद्या,दि.३ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबई येथील 'वर्षा' शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत तातडीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीने हा निर्णय झाल्याने उद्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होणारे आत्मदहन आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आल्याची घोषणा शेतकरी प्रतिनिधींनी केली.

आज नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत रिंगरोड बाधित शेतकऱ्यांची आढावा बैठक पार पडली.यावेळी छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर व आमदार देवयानी फरांदे आणि शेतकरी प्रतिनिधींनी भूसंपादन प्रक्रियेतील अनियमितता,प्रशासनाकडून होत असलेली दिशाभूल आणि शेतकऱ्यांवर लादले जाणारे एकतर्फी निर्णय याबाबत पुराव्यांसह वस्तुस्थिती मांडली.रिंगरोडच्या अलाइनमेंटबाबत अद्याप ठोस निर्णय नसणे,जिरायती व बागायती जमिनींचे योग्य मूल्यांकन न करणे,मंजूर दर परस्पर कमी करणे तसेच विविध आश्वासने देऊन शेतकऱ्यांची दिशाभूल करणे,या मुद्द्यांवर बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



शेतकऱ्यांनी मांडलेल्या प्रश्नांची गंभीरता लक्षात घेऊन पालकमंत्री गिरीश महाजन यांनी तत्काळ मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत संपूर्ण वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी मुंबईत तातडीची बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले. या बैठकीस विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद,कुंभमेळा आयुक्त,पोलीस आयुक्त,ग्रामीण पोलीस अधीक्षक,संबंधित सातही तालुक्यांचे प्रांताधिकारी तसेच एमएसआयडीसी,नगररचना, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे व पुराव्यांसह उपस्थित राहावे,असे निर्देश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीत शेतकऱ्यांच्या सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय होऊन न्याय मिळेल,असा विश्वास निर्माण झाल्याने आत्मदहन आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.मात्र,केवळ आश्वासनांवर समाधान न मानता प्रत्यक्ष निर्णय आणि त्याची अंमलबजावणी महत्त्वाची असल्याची भूमिका शेतकरी प्रतिनिधींनी स्पष्ट केली. उद्याच्या बैठकीनंतरच आंदोलनाची पुढील दिशा निश्चित करण्यात येणार असल्याचे करण गायकर यांनी सांगितले.

## वघईच्या गांधीबागेत महात्मा गांधींची १५७वी जयंती साजरी



डांग : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील वघई येथील गांधीबागेत डांग जिल्हा काँग्रेस समितीतर्फे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५७वी जयंती भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली. सत्य, अहिंसा आणि राष्ट्रसेवेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधी यांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. या कार्यक्रमाला डांग काँग्रेसचे माजी आमदार मंगलभाई गावित, वघईच्या सरपंच सिंदूबेन भोये, उपसरपंच रमेश भोये, माजी उपप्रमुख बळवंत देशमुख, तालुका सदस्य स्मिताबेन, काँग्रेस नेते गौतमभाई पटेल, तबरेज अहमद, नरेश रेंजड यांच्यासह काँग्रेसचे विविध पदाधिकारी, नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याचे तसेच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानाचे स्मरण केले. गांधीजींच्या सत्य, अहिंसा आणि राष्ट्रसेवेच्या विचारांचा अंगीकार करून ते समाजजीवनात प्रत्यक्षात आणण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमादरम्यान गांधीजींच्या विचारांना अभिवादन करत उपस्थितांनी त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा संदेश दिला.

## कचरा घंटागाडी, शाळेच्या दोन खोल्या व पाण्याचा फिल्टर प्लॅट

शिवनेरी : (स. गांवकरी)

ग्रामदैवत आई तुळजाभवानी पलंग यात्रा उत्सव निमित्त कुमशेत येथे अवघ्या काही महिन्यातच गावाला घंटागाडी दिली आहे . आपल्या हातामध्ये अजून साडेचार वर्ष विकाससाठी आहे असे गौरव उद्गार नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्या उल्का मोरे यांनी सत्कार स्वीकारताना सांगितले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत येथे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी नवीन शाळेच्या दोन खोल्या वर्ग व शाळेला पाण्याचा फिल्टर प्लॅट यानिमित्ताने दिला आहे असे गौरव उद्गार नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या छाया तांबे यांनी सत्कार स्वीकारताना सांगितले . याप्रसंगी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना नेते बबन थोरात , शिवसेना पक्ष सचिव विकास थोरात , जि. प. स. गुलाब पारखे , भाजप जिल्हाध्यक्ष गणेश कवडे, संचालक संतोष चव्हाण , पी एस आय सोनल डोके ,सरपंच रवींद्र डोके , ग्रामपंचायत सदस्य अंबादास डोके , उपशिक्षक श्याम लालोपोड यांनी यात्रेनिमित्त शुभेच्छा दिल्या.



# विद्यार्थ्यांनी फुलवली सेंद्रिय परसबाग

आळेफाटा : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव आनंद येथे विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेती, पर्यावरण संवर्धन तसेच श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजावे, यासाठी शालेय परिसरात सेंद्रिय पद्धतीने परसबाग विकसित करण्यात आली आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विविध पालेभाज्या, फळभाज्या, फुलझाडे तसेच औषधी वनस्पतींची ओळख होत असून, शेतीविषयक ज्ञानही प्रत्यक्ष कृतीतून मिळत आहे.

या परसबागेत आले, हळद, कोरफड, तुळस, गवती चहा, अडुळसा आणि सब्जा यांसारख्या औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. तसेच दुधी भोपळा, घोसाळे, डांगर भोपळा, कारले, काकडी, तोंडली आदी वेलवर्गीय भाज्यांची लागवड करण्यात आली आहे. वांगी, कोबी, टोमॅटो, बटाटा, कांदा, फरसबी, अळू आदी भाज्यांचे उत्पादन घेण्याचा अनुभवही विद्यार्थी घेत आहेत. विविध प्रकारची फुलझाडे विद्यार्थ्यांनी स्वतः लावून शालेय परिसर अधिक हिरवागार व आकर्षक केला आहे.



या उपक्रमासाठी माननीय किसन महादू चौगुले यांनी आल्याचे रोप शाळेला मोफत उपलब्ध करून दिले. तसेच पिकांसाठी आवश्यक सेंद्रिय खते व बी बियाणे श्री. अविनाश आढाव यांनी व पंचायत समिती जुन्नर या कार्यालयाचे कृषी विभागाचे अधिकारी निलेश बुधवंत यांनी देखील विविध रोप व सेंद्रिय खते उपलब्ध करून दिली. त्यामुळे रासायनिक खतांचा वापर न करता सेंद्रिय पद्धतीने पिकांची लागवड, निगा व वाढ कशी करावी, याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळत आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. प्रदीप गडगे तसेच महिला भगिनींनी परसबागेच्या मशागतीसाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते डी. बी. नाना वाळुंज आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. दत्तात्रय चौगुले यांनी विशेष प्रयत्न केले. मुख्याध्यापक सुनील ठिकेकर, सहशिक्षिका छाया डुंबरे, सुनंदा तांबे, गीता बोऱ्हाडे आणि सविता खेत्री यांनी उपक्रमासाठी विशेष सहकार्य केले. शालेय परसबागेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये 'शिका आणि प्रत्यक्ष कृतीतून शिका' या संकल्पनेला चालना मिळत असून, शेतीचे महत्त्व, पर्यावरण संवर्धन, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा आणि निसर्गाशी नाते यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर होत आहेत.

# अखेर अकादमीची मिळकत सील

## विनर्स अकादमीच्या मिळकतीवर आळंदी नगरपरिषदेची कारवाई

आळंदी : (स. गांवकरी)




दिवेआगर येथे आळंदीहून सहली साठी गेलेल्या आठ विद्यार्थ्यांचा झालेल्या दुर्दैवी मृत्यूच्या पार्श्वभूमीवर आळंदी नगरपरिषदे मार्फत शहरातील संबंधित कोचिंग क्लासेस व आस्थापनांची पाहणी करण्यात येत आहे. या अनुषंगाने आळंदी नगरपरिषदेच्या पथकाने विनर्स अकादमीच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणी दरम्यान श्री. नारायण हरिभाऊ दस यांच्या मालकीची मालमत्ता क्र. जुना ११३७, नवीन LAN00001729 या मिळकती मध्ये विनर्स अकादमी कोचिंग क्लासेस सुरू असल्याचे निदर्शनास आले. सदर आस्थापनेने नगरपरिषदेकडून आवश्यक व्यवसाय परवाना / ना- हरकत प्रमाणपत्र घेतल्याचे नगरपरिषदेच्या अभिलेखा वरून निदर्शनास आले नाही. त्यामुळे लागू असलेल्या कायदे व नियमांनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते..

त्या नुसार मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या आदेशानुसार कर विभाग प्रमुख श्रीमती सीमा चारवे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेच्या पथकाने विनर्स अकादमीची सदर मिळकत सील करण्याची कार्यवाही केली. या कार्यवाही दरम्यान पोलीस प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यवाही ही संबंधित आस्थापनांनी आवश्यक परवानग्या व नियमांचे पालन करावे तसेच नगरपरिषदेकडून लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या अनुषंगाने करण्यात आली आहे.




उदापुर गावचे सुपुत्र आणि एस.आर. ट्रेडिंग कंपनीचे मालक रोहिदास शिंदे यांना कृषी उत्पन्न बाजार समिती, जुन्नर यांच्याकडून उत्कृष्ट आदर्श आडतदार पुरस्कार मिळाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन! आपल्या कष्टाळू वृत्तीने,प्रामाणिक व्यवहाराने आणि व्यवसायातील उल्लेख नीय योगदानामुळे मिळालेला हा सन्मान निश्चितच उदापुर च्या शेतकरी व ग्रामस्थांसाठी अभिमानास्पद आहे.

## थोडक्यात बातम्या...




### किशोर पोतदार यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : शिवसेना महानगर प्रमुख प्रकाश मारावार यांच्या नेतृत्वाखाली व नांदेड लोकसभा संपर्कप्रमुख किशोर पोतदार यांच्या प्रमुख उपस्थितीत विसावा हॉटेल येथे संपन्न झाली यावेळी सिडको घरहस्तांतरण विषय राबवुन यशस्वी केल्याबद्दल शिवसेना संघटक प्रमोद मैड यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीला शिवसेना युवा विभागीय सचिव महेश खेडकर,सहसंपर्क प्रमुख दयाल गिरी,उपजिल्हाप्रमुख व्यंकोबा येडे,बालाजी कल्याणकर,महानगरप्रमुख नांदेड दक्षिण मनोज यादव, शहरप्रमुख अर्जुनसिंग ठाकूर, जितुसिंग टाक, ब्रिजलाल उगवे, नवज्योतसिंग गाडीवाले व शहर प्रवक्ता नागनाथ महादापुरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी शिवसेना नांदेड संपर्कप्रमुख किशोर पोतदार यांनी प्रभागनिहाय प्रभाग क्रमांक १ ते २० च्या सर्व पदाधिकारी आडी आडचणी जाणून घेतली. यावेळी सिडको घर हस्तांतरण चा विषय राबवून यशस्वी केल्याबद्दल शिवसेना संघटक प्रमोद मैड यांचा संपर्कप्रमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नांदेड लोकसभा संपर्कप्रमुख किशोर भाऊ पोतदार यांनी पक्ष एकजूट व एकसंघ आणि वाढीसाठी सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीचे आयोजन व प्रस्तावना महानगरप्रमुख प्रकाश मारावार यांनी केले.या बैठकीचे सूत्र संचालन शिवसेना नांदेड प्रवक्ता नागनाथ महादापुरे यांनी केले. बैठकीच्या यशस्वितेसाठी नितीन सरोदे,सचिन पाटील आदींनी प्रयत्न केले. बैठकीला महानगर क्षेत्रातील प्रमुख पदाधिकारी व बहुसंख्य शिवसैनिकांची उपस्थिती होती.

### असर्जनमध्ये महावितरणची मनमानी आणि 'हुकुमशाही' कारभार!

- दिवसातून ४ ते ५ वेळा वीज गायब; नागरिक उकाड्याने हैराण, तर अधिकारी-कर्मचारी सुस्तावले

नवीन नांदेड (स. गांवकरी) : "जेव्हा मनात येईल तेव्हा लाईट बंद आणि काम चालू," असा मनमानी आणि उद्धट कारभार महावितरणच्या वतीने असर्जन परिसरात सुरू असून, येथील नागरिकांना अघोषित भारनियमनाचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रोज नित्यनियमाने दिवसातून तब्बल चार ते पाच वेळा आणि प्रत्येक वेळी एक ते दोन तास वीज पुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या गलथान कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. या सततच्या वीजकपातीबाबत जेव्हा नागरिक महावितरणच्या स्थानिक कर्मचारी व अधिकाऱ्यांना फोन करतात, तेव्हा "अमुक-अमुक ठिकाणी फाल्ट आला असून तो दुरुस्त करत आहोत," हे त्यांचे ठरलेले रेडीमेड उत्तर असते. मात्र, जनतेच्या मनात हाच संतप्त सवाल आहे की, "जर दररोजच फाल्ट येतो, तर नेमके काम कसे चालले आहे? हा कायमस्वरूपी फाल्ट दुरुस्त का होत नाही?" सध्याच्या कडक उन्हाळ्यात आणि दमट वातावरणामुळे घरातील म्हातारी माणसे, आजारी व्यक्ती आणि लहान मुले प्रचंड उकाड्याने बेजार झाली आहेत. अनेकदा तर तासनतास वीज नसते, ज्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. परंतु, स्थानिक अधिकाऱ्यांना या सामान्य जनतेच्या वेदनेशी काहीही देणेघेणे उरलेले नाही. विशेष म्हणजे, त्रस्त नागरिकांनी वरिष्ठांना फोन करण्याचा प्रयत्न केल्यास ते फोन उचलण्याचे सौजन्यही दाखवत नाहीत.

### वटवृक्ष देवस्थानचे देशभरात नावलौकीक : विजयकुमार पाटील

अक्कलकोट (स. गांवकरी) : येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीलाला आज न्याय देवतांच्या माध्यमातून मोठा मान मिळाला, कारण येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे कारभारातील सकारात्मक बदल अणि पारदर्शकतेमुळे वटवृक्ष देवस्थानचे देशभरात नावलौकीक झाले असल्याचे मनोगत कर्नाटक कलबुर्गी उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती विजयकुमार पाटील यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सपत्निक व सहकुटुंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी न्यायमुर्ती विजयकुमार पाटील यांचा सपत्निक व सहकुटुंब श्री स्वामी समर्थांचे कृपावस्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी न्यायमुर्ती विजयकुमार पाटील बोलत होते. पुढे बोलताना न्यायमूर्ती पाटील म्हणाले की श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान आहे. भाविकांसाठी दर्शन व्यवस्थेत मंदिर समितीने केलेले नियोजन हे उत्कृष्ट आहे. गर्दी असूनही रांग, स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था अतिशय शिस्तबद्ध आहे. पारदर्शक कारभार आणि आधुनिक सुविधा यामुळे देवस्थानचा नावलौकिक आणखी वाढेल. मंदिर समितीच्या या कार्याचे आम्ही कौतुक करतो असेही मनोगत व्यक्त केले. यावेळी अक्कलकोट न्यायालयाचे न्यायमुर्ती शेख मॅडम, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, विपूल जाधव, स्वप्निल मोरे, गिरीश पवार, महेश मस्कले, ऋषिकेश लोणारी आदीसह भाविक भक्त उपस्थित होते.

## 'समर्थ गांवकरी'च्या मुंबई-कोकण वितरणाबाबत चर्चा!





### मुंबईत जाफरभाई शेख यांचा सत्कार

ठाणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्रातील वृत्तपत्रांच्या प्रिंटिंग प्रेस व वितरण व्यवसायाचा नवी मुंबई तसेच कोकण विभागात दीर्घकाळाचा अनुभव असलेले हरहुन्नरी जाफरभाई शेख यांच्यासोबत आज मुंबई येथील एन.के.टी. हॉल येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीत 'दैनिक समर्थ गांवकरी'च्या मुंबई, नवी मुंबई तसेच कोकण विभागातील वितरण व्यवस्था, प्रिंटिंग व्यवसाय आणि मंत्रालयातील वितरणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी 'दैनिक समर्थ गांवकरी' समूहाच्या वतीने मुंबई नगरी तसेच कोकण विभागात वृत्तपत्राचे वितरण अधिक प्रभावीपणे वाढविण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्याबाबत चर्चा झाली. तसेच नवी मुंबई विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून मंत्रालयासह ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि पालघर जिल्ह्यांमध्ये वितरणाचा विस्तार करण्याबाबत आढावा घेण्यात आला. संबंधित जिल्ह्यांमध्ये वितरण यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी विविध बाबींवर चर्चा करण्यात आली. यावेळी 'दैनिक समर्थ गांवकरी' समूहाचे समूह संपादक शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या हस्ते जाफरभाई शेख यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी 'दैनिक समर्थ गांवकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, नवी मुंबई विभागीय संपादक दशरथ चव्हाण, महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर आदी उपस्थित होते. बैठकीत मुंबई व कोकण विभागातील वृत्तपत्र वितरण, प्रिंटिंग तसेच कार्यालयीन कामकाजाचा आढावाही घेण्यात आला.

## थोरल्या पादुका मंदिरात ज्ञानेश्वरी जयंती उत्साहात साजरी

आळंदी : (स. गांवकरी)




श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त वडमुखवाडी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिरात श्री ज्ञानेश्वरी जयंती व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा भक्तिमय हरिनाम गजराच्या वातावरणात संपन्न झाला. थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी जयंतीनिमित्त ज्ञानेश्वरी ची पूजा व श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेची व पादुकांची विधिवत पूजा करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थित भाविकांनी पसायदान म्हणत कार्यक्रमाची सांगता केली. यावेळी चंद्रकांत मोरे, साहेबराव काशीद, संपतराव साबळे, शांताराम दाते, शिवाजी तळेकर, रानबा फुलवरे आदी मान्यवर उपस्थित होते. थोरल्या पादुका मंदिरात 28 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2026 या कालावधीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे ज्ञानेश्वरी व्यासपीठ विठ्ठल महाराज वानखेडे यांनी भूषविले. पारायण सोहळ्यात अनेक महिला व पुरुष भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत ज्ञानेश्वरीचे वाचन केले.

## सागर परशुराम नेहे यांना 'ठाणे गौरव' पुरस्कार!

ठाणे : (स. गांवकरी)

समाजहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करून लोकांच्या समस्या प्रशासकीय पातळीवर मांडणारे सामाजिक कार्यकर्ते सागर परशुराम नेहे यांना १ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते 'ठाणे गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. सागर नेहे यांनी अकोले–मुंबई संपर्कमार्ग व देविचा घाटातून प्रस्तावित पर्यायी मार्ग, ठाणे पूर्वेतील क्लस्टर पुनर्विकास, तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील जलस्रोत व पाणीव्यवस्थापन यांसारख्या सार्वजनिक प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला आहे. अकोले तालुका आणि ठाणे-शहापूर परिसरातील दळणवळण सुलभ व्हावे, ग्रामीण भागाला मुंबई-ठाणे परिसराशी जोडणारा पर्यायी मार्ग उपलब्ध व्हावा, या उद्देशाने त्यांनी सन २००१ पासून प्रयत्न सुरू ठेवल्याचे सांगितले जाते. देविचा घाट संपर्कमार्गाच्या विषयात त्यांनी १२ माहिती अधिकार अर्ज दाखल करून प्रथम अपीलही केले आहे. अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथील सार्वजनिक




बांधकाम विभाग तसेच संबंधित प्रशासकीय यंत्रणांकडे पत्रव्यवहार, कार्यालयीन भेटी आणि सुनावण्यांच्या माध्यमातून त्यांनी पाठपुरावा केला आहे. त्यांच्या या प्रयत्नांची Business Press माध्यमाने दखल घेत त्यांना 'The Mountain Man of Maharashtra' असा विशेष उल्लेख केल्याचेही नमूद करण्यात आले आहे. ठाणे पूर्वेतील क्लस्टर पुनर्विकासाच्या प्रश्नात नागरिकांना योग्य माहिती मिळावी, पुनर्विकास प्रक्रिया पारदर्शक असावी आणि रहिवाशांच्या हिताचा विचार व्हावा, यासाठी त्यांनी भूमिका मांडली आहे. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील पाणीप्रश्न, जलस्रोतांचे नियोजन आणि पाणी व्यवस्थापनाच्या विषयांकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.

## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

### 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरात स्वच्छता मोहीम

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती आज उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, उपकुलसचिव रामदास पेद्देवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, प्रा. नंदकुमार बोधगिरे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनीही महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा शुभारंभ कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम न राहता ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनशैलीचा भाग झाली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

विद्यापीठ परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच पर्यावरण संवर्धन, स्वच्छता व आरोग्याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. विद्यापीठ परिसर, वसतिगृहे, परिसरातील विविध ठिकाणे तसेच दत्तक गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवून समाजामध्ये स्वच्छतेचा संदेश पोहोचवावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विद्यापीठ परिसराची स्वच्छता केली. महात्मा गांधी यांच्या स्वच्छता, स्वावलंबन आणि सामाजिक बांधिलकीच्या विचारांना कृतीतून अभिवादन करण्यात आले.

## येरगी ग्रामसभेत व रिफॉर्म उत्सवात केंद्रीय सहसचिव पी. नरहरी यांचा सहभाग

### ग्रामस्थांशी संवाद साधत शाश्वत ग्रामविकासासाठी केले मार्गदर्शन

- बालिका पंचायत उपक्रमाचे विशेष कौतुक
- ग्रामसभेत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



केंद्र सरकारचे सहसचिव पी. नरहरी यांनी येरगी येथे आयोजित ग्रामसभा व रिफॉर्म उत्सवात सहभागी होऊन ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. ग्रामविकासाच्या विविध विषयांवर ग्रामस्थांची मते, सूचना व अनुभव जाणून घेत त्यांनी शासनाच्या योजना आणि उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन केले. रिफॉर्म उत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, लोककल्याणकारी उपक्रम आणि प्रशासकीय सुधारणांची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आली. यावेळी नरहरी यांनी विविध शासकीय योजनांच्या लाभार्थींशी संवाद साधून योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळाल्यानंतर त्यांच्या जीवनात झालेल्या बदलांची माहिती घेतली. योजनांची माहिती आणि त्यांचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

येरगी येथील बालिका पंचायत उपक्रमाची नरहरी यांनी विशेष दखल घेत कौतुक केले. ग्रामीण भागातील बालिकांना ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे, त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करणे आणि निर्णयप्रक्रियेची जाणीव निर्माण करणे, हा उपक्रम अनुकरणीय असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी नरहरी यांच्या हस्ते वृक्षलागवड करण्यात आली तसेच जलतारा कामांचे भूमिपूजन करण्यात आले. ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून जलसंधारणाची कामे, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत ग्रामविकासाला गती देण्याचे आवाहन करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची यावेळी उपस्थिती होती. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत शासकीय योजनांच्या प्रचार-प्रसारासाठी तयार करण्यात आलेले पोस्टर्स, बॅनर्स तसेच विविध शासन आदेशांची मांडणी नरहरी यांनी पाहिली. शासनाच्या योजना व उपक्रमांची माहिती सोप्या आणि प्रभावी पद्धतीने सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी करण्यात येत असलेल्या या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २८८ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार दि. ०३ ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# ‘भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र’ला केंद्र सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पोस्ट

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मराठी भाषिकांसाठी अभिमानास्पद बातमी आहे. अभिजात मराठी भाषा सन्मान दिवसाच्या पुर्वसंध्येला केंद्र सरकारने पुण्यामध्ये ’अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र’ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाला काही तासांपूर्वीच केंद्र सरकारने मंजुरी देण्यात आली आहे. ’अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र’ला केंद्र सरकारकडून घोषणा करण्यात आल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहे. नेमकं मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोस्टमध्ये काय लिहिलंय, जाणून घेऊया...

सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये मुख्यमंत्र्यांनी लिहिलंय की, लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी... मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्यानंतर ’अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र’ स्थापन करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरु होता. मला हे सांगताना अतिशय आनंद होतो की, केंद्र सरकारने ही मागणी मान्य केली असून, पुण्यातील डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था येथे ’अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र’ स्थापन करण्यास मंजुरी प्राप्त झाली आहे. याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम राज्य सरकारने आधीच हाती घेतले होते. तो केंद्राकडे सादर करुन आवश्यक निधी प्राप्त करण्याचा मार्गही यामुळे मोकळा होणार आहे. ’अभिजात मराठी भाषा दिना’च्या पूर्वसंध्येला हा निर्णय झाल्याबद्दल महाराष्ट्रातील आम्हा सर्व नागरिकांना अत्यानंद होतो आहे. महाराष्ट्र, देश आणि जगभरातील मराठीजनांसाठी ही बातमी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची आहे. या निर्णयाबद्दल मी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे मनापासून आभार मानतो. पोस्टच्या शेवटी मराठी असं लिहिलं आहे.



दरम्यान, भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने ४ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला ’अभिजात भाषेचा’ दर्जा बहाल केला होता. या ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णयाचाच पुढील टप्पा म्हणून आता पुण्यात या उत्कृष्ट केंद्राची स्थापना केली जात आहे. या महत्त्वाच्या केंद्राच्या उभारणीमुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, संशोधनासाठी आणि विविध विकास प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडून मोठा निधी उपलब्ध होणार आहे. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने, मराठीसह आसामी, बंगाली, पाली आणि प्राक्रित या भाषांसाठीही ’भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र’ उभारण्यासाठी मंजुरी दिली आहे.

# पुण्यात उभारणार ’अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र’ केंद्र सरकारची मंजुरी

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

अभिजात मराठी भाषा सन्मान दिनाच्या (३ ऑक्टोबर) पूर्वसंध्येला जगभरातील मराठी भाषिकांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बातमी समोर आली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने पुण्यातील ऐतिहासिक डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्थेमध्ये (मानिव अभिमत विद्यापीठ) ’अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र’ स्थापन करण्यास अधिकृत मंजुरी दिली आहे. या महत्त्वाच्या केंद्राच्या उभारणीमुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, संशोधनासाठी आणि विविध विकास प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडून मोठा निधी उपलब्ध होणार आहे. या केंद्राच्या स्थापनेसाठी तज्ज्ञांमार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आला असून, तो लवकरच सादर केला जाईल.

ऐतिहासिक निर्णयाचापुढील टप्पा

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने ४ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला ’अभिजात भाषेचा’ दर्जा बहाल केला होता. या ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णयाचाच पुढील टप्पा म्हणून आता पुण्यात या उत्कृष्ट केंद्राची स्थापना केली जात आहे.



मंत्री उदय सामंत यांनी मानले आभार

या ऐतिहासिक निर्णयावर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्राचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत म्हणाले, आज आपल्या सर्वांसाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बातमी आहे. अभिजात मराठी भाषा सन्मान दिनाच्या पूर्वसंध्येला मिळालेले हे यश आपल्या मराठी संस्कृतीचे आणि भाषेचे वैभव अधिक उंचावणारे आहे. केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याबद्दल मी समस्त मराठी भाषिकांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. या केंद्रामुळे मराठी भाषेचा प्राचीन वारसा, इतिहास आणि साहित्याचा जागतिक पातळीवर विस्तार होण्यास मोठी मदत होणार असून, संशोधकांना हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे.

# आ. रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

## कर्जत-जामखेडमधील तरुण-तरुणींना रोजगाराची संधी

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

कर्जत-जामखेड मतदारसंघातील तरुण-तरुणींना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आ. रोहितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बारामती ग्रो लिमिटेड व कर्जत-जामखेड एकात्मिक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग यांच्या सहकार्याने हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.



कर्जत-जामखेड मतदारसंघातील युवकांना रोजगाराच्या माध्यमातून सक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात विविध औद्योगिक क्षेत्रांतील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यामुळे स्थानिक तरुणांना आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी मिळणार असून, पात्र उमेदवारांच्या थेट मुलाखती घेऊन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्याचे आयोजन कर्जत येथे शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत दादा पाटील महाविद्यालय येथे, तर जामखेड येथे शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत नागेश विद्यालय व कन्या विद्यालय येथे करण्यात आले आहे.

दहावी, बारावी उत्तीर्ण, कोणत्याही ट्रेडमधील आयटीआय, विविध पदविका अभ्यासक्रम तसेच B.Sc., B.Com. आणि B.A. पदवीधारक उमेदवारांना या रोजगार मेळाव्यात सहभागी होता येणार आहे. ग्रामीण भागातील तरुणांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी आपल्या बायोडाटाच्या ३ ते ४ प्रती, सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती, पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड व ओळखपत्र सोबत आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कर्जत-जामखेडमधील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घेऊन रोजगाराची संधी मिळवण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# खासदार लंके, आमदार राजळे-लहामटे-दाते मैदानात

## जिल्हा बँक निवडणुकीत वाढली रंगत

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू असून, गुरुवारी एकाच दिवशी ९२ उमेदवारांनी १०० उमेदवारी अर्ज दाखल केले. खासदार नीलेश लंके, आमदार आशुतोष काळे, आमदार मोनिका राजळे, आमदार किरण लहामटे, आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार चंद्रशेखर घुले आणि वैभव पिचड यांच्यासह बँकेचे माजी अध्यक्ष व संचालकांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

दरम्यान, गुरुवारी आणखी १६६ इच्छुकांनी उमेदवारी अर्ज नेल्याने अर्जविक्रीचा आकडा ८४६ वर पोहोचला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवार, दि. ५ ऑक्टोबर हा शेवटचा दिवस असल्याने अखेरच्या दिवशी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी राजकीय पातळीवर प्रयत्न सुरू असतानाच इच्छुकांची वाढती संख्या आणि दाखल होणारे उमेदवारी अर्ज यामुळे नेत्यांसमोरील आव्हान वाढले आहे. अर्जाची मोठ्या प्रमाणावर झालेली विक्री आणि प्रत्यक्ष उमेदवारी दाखल करण्याचा वाढता वेग पाहता, बिनविरोध निवडणुकीसाठी नेत्यांना मोठी कसरत करावी लागण्याची चिन्हे आहेत.

गेल्या गुरुवारी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मतदारसंघांत अनेक प्रमुख इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. नगर तालुक्यात बाळासाहेब हराळ, पाथर्डी तालुक्यात आमदार मोनिका राजळे व कडूचंद्र शेटे, तर अकोले तालुक्यात आमदार किरण लहामटे, शरद चौधरी, संजीवनी शिंदे, सीताराम गायकर, बाबासाहेब भोर, रावसाहेब वाकचौरे, कैलास वाकचौरे, माजी आमदार वैभव पिचड आणि विकासराव शेटे यांचा समावेश आहे.

राहुरी तालुक्यात हर्ष तनपुरे, जामखेडमध्ये अमोल राळेभात व सचिन घुमरे, तर कोपरगावमध्ये संजय शिंदे व अनिल कदम यांनी अर्ज दाखल केले. कर्जत तालुक्यात तुषार पिसाळ, अंबादास पिसाळ, देविदास देशमुख, मंगेश जगताप, मंजुषा गुंड व ज्योती शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. श्रीरामपूरमधून करण ससाणे, श्रीगोंद्यातून राजेंद्र नागवडे, शेवगावमधून माजी आमदार चंद्रशेखर घुले व राजश्री चंद्रशेखर घुले, तर पारनेरमधून गीतांजली शेळके,आमदार काशिनाथ दाते आणि खासदार नीलेश लंके यांनी अर्ज दाखल केले आहेत.

शेतीपूरक व शेतमाल प्रक्रिया संस्था मतदारसंघातून राजेंद्र नागवडे, गंगाराम धुमाळ, रामदास आंब्रे, प्रकाश नाईकवाडी, सदाशिव पोखरकर, आमदार आशुतोष काळे, रावसाहेब वाकचौरे आणि अंकुश शेळके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. बिगरशेती संस्था मतदारसंघातून राजेंद्र नागवडे, बाळासाहेब नाईकवाडी, परिघा आरोटे, अविनाश कानवडे, संजय भळगट, नंदकिशोर औताडे, वसंत लोढा, सचिन देसर्डा, जनार्दन पठारे, अशोक थोरे आणि अमोल गर्जे यांच्यासह विविध इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत.




महिला राखीव मतदारसंघातून अनुराधा नागवडे, सुवर्णा लहामगे, संजीवनी शिंदे, सोनल गायकवाड, जयमाला सोले पाटील, रेखा नवले, मंजुषा गुंड, शैलजा लोटके आणि संगीता जयंत वाघ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.



# राजधानीत राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांना जयंतीदिनी अभिवादन

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त निवासी आयुक्त तथा सचिव डॉ.श्वेता सिंघल यांनी त्यांना विनम्र अभिवादन केले. कोपर्निकस मार्ग स्थित महाराष्ट्र सदन येथे आयोजित कार्यक्रमास महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल,सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, व्यवस्थापक सारिका शेलार, प्रमोद कोलपते, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# ठाणे जिल्हा परिषदेत पेन्शनधारकांना महिन्याच्या पहिल्याच दिवशी पेन्शन अदा

## प्रायोगिक तत्त्वावर राज्यात प्रथमच उपक्रमाची अंमलबजावणी; २,२५० पेन्शनधारकांना वेळेत पेन्शन अदा

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्यात प्रायोगिक तत्त्वावर जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत पेन्शनधारक अधिकारी व कर्मचाऱ्यांना महिन्याच्या पहिल्याच दिवशी पेन्शन अदा करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार आज, दि. ०१ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद अंतर्गत पेन्शनधारकांना त्यांच्या खात्यावर पेन्शन अदा करण्याचे कामकाज पूर्ण करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे यांच्या विशेष प्रयत्नातून ही कार्यवाही निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात आली. राज्यात ठाणे, सातारा आणि नागपूर जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पेन्शनधारकांना महिन्याच्या पहिल्याच दिवशी पेन्शन उपलब्ध करून देण्यात जिल्हा परिषद ठाणेला यश मिळाले आहे.

पेन्शनधारकांच्या आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने महिन्याच्या सुरुवातीलाच पेन्शन उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषद ठाणेच्या वित्त व सामान्य प्रशासन विभागाच्या समन्वयातून पेन्शन अदा करण्याच्या प्रक्रियेचे नियोजन करण्यात आले. डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ, गतिमान आणि वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

आज एकाच दिवशी जिल्हा परिषद अंतर्गत एकूण २,२५० पेन्शनधारकांना पेन्शन अदा करण्यात आली. यामध्ये जिल्हा परिषद मुख्यालय, ठाणे येथील ४२४, मुरबाड येथील ३४४, शहापूर येथील ४४९, भिवंडी येथील २६१, कल्याण येथील ४८० आणि अंबरनाथ येथील २९२ पेन्शनधारकांचा समावेश आहे. अशा प्रकारे मुख्यालयासह सर्व तालुकास्तरावरील पेन्शनधारकांची पेन्शन महिन्याच्या पहिल्याच दिवशी अदा करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

पेन्शन अदा करण्याची कार्यवाही निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद मुख्यालय वित्त विभाग/सामान्य प्रशासन विभाग तसेच तालुकास्तरावरील विभागप्रमुख आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम केले. विविध स्तरांवरील आवश्यक माहितीचे संकलन, पडताळणी तसेच आर्थिक कार्यवाही वेळेत पूर्ण करण्यात आली. त्यामुळे मुख्यालय ठाणे तसेच मुरबाड, शहापूर, भिवंडी, कल्याण आणि अंबरनाथ येथील एकूण २,२५० पेन्शनधारकांना वेळेत पेन्शन अदा करणे शक्य झाले.

प्रशासकीय कामकाजात आधुनिक डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून वेळेची बचत, कार्यक्षम समन्वय आणि वेळबद्ध सेवा यांना प्राधान्य देण्याच्या दिशेने जिल्हा परिषद ठाणेच्या वतीने ही कार्यवाही करण्यात आली आहे.

पेन्शनधारकांना महिन्याच्या पहिल्याच दिवशी पेन्शन मिळाल्याने त्यांच्या आर्थिक नियोजनास निश्चितच सुविधा होणार असून, पेन्शन वितरणाची प्रक्रिया अधिक वेळबद्ध आणि सुलभ करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद ठाणेच्या या उपक्रमाला महत्त्व प्राप्त झाले आहे.



## थोडक्यात पण महत्त्वाचे

### जोर्वे येथील समता विद्या मंदिरात गांधी–शास्त्री जयंती उत्साहात!

जोर्वे (समर्थ गांवकरी)

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या जोर्वे येथील समता विद्या मंदिर व शिल्प. मधुकरराव संतुजी थोरात कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापिका नेहा आंबरे होत्या. प्रारंभी पर्यवेक्षक विठ्ठल तांबे यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्रा. नेहा आंबरे म्हणाल्या की, स्वच्छता हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. स्वच्छतेकडून समृद्धीकडे वाटचाल करायची असते. निरोगी शरीरातच निरोगी जीवन वास करते. त्यामुळे निरोगी जीवन हीच आपली खरी संपत्ती आहे. यावेळी ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र गिते यांनी आपल्या मनोगतात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. गुरु–शिष्य परंपरा, 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले' या विचारासह स्वच्छ भारत अभियानात विद्यार्थ्यांची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. विद्यार्थ्यांनीही मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विषयाचे शिक्षक यशवंत दिघे यांनी केले, तर सूत्रसंचालन अशोक डोळस यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य भारत हासे, सांस्कृतिक विभागप्रमुख भाऊराव भांगरे तसेच सर्व शिक्षकांचे मोलाचे योगदान लाभले.

### आंबेगाव–शिरूर मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीची वळसे पाटील करणार पाहणी

मंचर (समर्थ गांवकरी)



आंबेगाव–शिरूर विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांचा शनिवार दि.३ रोजी दौऱ्याचे आयोजन करण्यात आला आहे.या दौऱ्यात विविध गावांना भेटी देऊन शेतकरी, नागरिक, लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला जाणार आहे. राज्य सरकारने विविध तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला असला तरी पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्याचा त्यात समावेश करण्यात आलेला नाही.मात्र लोणी–धामणी परिसर, सातगाव पठार तसेच आदिवासी भागातील अनेक गावांमध्ये पावसाअभावी दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई, पिकांची स्थिती, शेतीचे नुकसान आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता यांचा आढावा दौऱ्यात घेतला जाणार आहे.शनिवारी सकाळी ९ वाजता पहाडदरा, ९:३० वाजता शिरदाळे,१० वाजता धामणी, १०:३० वाजता लोणी,११ वाजता वडगाव पीर व दुपारी १२ वाजता मांदळेवाडी येथे भेट दिली जाणार आहे.त्यानंतर शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाई, मोराची चिंचोली,धामरी,पाबळ व केंदूर येथे पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला जाणार आहे.

### दिपक पाचपुते यांचे अपघाती निधन

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील रहिवासी सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या डिसलरी विभागातील सेवानिवृत्त अधिकारी दिपक बाजीराव पाचपुते यांचे आज दि.२ आक्टोंबर रोजी दुःखद निधन झाले. ते ६८ वर्षे वयाचे होते. त्यांच्या मागे दोन भाऊ,पत्नी, दोन मुल,सुना,नातवंडे, असा परिवार आहे. काष्टी गावचे सरपंच स्व.सुनिलतात्या पाचपुते,व सेवानिवृत्त कृषी सहाय्यक अनिल पाचपुते यांचे बंधू होते. तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काष्टी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुदर्शन पाचपुते यांचे ते वडील होते. दि.२९ सप्टेंबर रोजी नगर–दौंड महामार्गावर सांगवी दुमाला हद्दीत टोलनाका परिसरात सायंकाळच्या वेळी एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला पाठिमागून जोराची धडक दिल्यानंतर ते गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर पुणे येथे खाजगी हॉस्पिटलमधे उपचार सुरु होते.त्यावेळी उपचारा दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.अतिशय शांत संयमी व्यक्तीमत्व होते. काष्टी येथील घोडनदीतिरी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीला मोठ्या संख्येने तालुक्यातील पदाधिकारी हजर होते.

### पेमराज सारडा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाच्या जल्लोष युवक महोत्सवात यश



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाने 'जल्लोष २०२६ युवक महोत्सव' आयोजित केला आहे.या महोत्सवांतर्गत संगमनेर येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये पेमराज सारडा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले.या स्पर्धेत मनुजा देशमुख – सुवर्ण पदक (शास्त्रीय नृत्य),अमिना खान –सुवर्ण पदक (कार्टूनिंग), अर्पिता देशमुख–रौप्य पदक (पोस्टर मेकिंग),फरहीन सय्यद– कास्य पदक (सुगम गायन) अशी चार पदके प्राप्त केली. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, मानद सचिव सुमतीलाल कोठारी,कार्याध्यक्ष आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी या विद्यार्थ्यांचा सत्कार केला.यावेळी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देताना त्या म्हणाल्या,पेमराज सारडा महाविद्यालय कला,साहित्य व सांस्कृतिक उपक्रमांना सतत प्रोत्साहन देत असते. सांस्कृतिक स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी व्हावे.

# पोलिसांना कायदा हातात घेण्याचा अधिकार आहे का?

नवी मुंबई (समर्थ गांवकरी)

कायदा रक्षणाची शपथ घेणाऱ्या पोलिसांनीच कायदा हातात घेतला तर सर्वसामान्य नागरिकांनी न्याय मागायचा तरी कोणाकडे? असा संतप्त सवाल वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घटनेनंतर उपस्थित झाला आहे. महिला पत्रकार प्रिया सरोदे यांच्या कानाखाली महिला पोलीस अधिकाऱ्याने सर्वांसमक्ष मारल्याची घटना घडल्याने पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

एका महिला पत्रकारासमोरच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांसमोर पोलीस अधिकाऱ्याकडून अशा प्रकारे हात उचलला जात असेल, तर पोलिसांच्या अधिकाराला आणि जबाबदारीला मर्यादा कोण घालणार? पोलीस आहेत म्हणून काहीही करण्याचा अधिकार मिळतो का? असा थेट सवाल नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत 'अवंतारा स्पा' सुरू असल्याबाबत महिला पत्रकार प्रिया सरोदे यांनी पोलिसांकडे तक्रार अर्ज केला होता. सदर अर्जाची चौकशी करून त्यामध्ये तथ्य नसल्याचे पत्र पोलिसांकडून देण्यात आल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर प्रिया सरोदे यांनी काही सामाजिक कार्यकर्त्यांसह संबंधित स्पामध्ये जाऊन तेथे सुरू असलेल्या कथित गैरप्रकारांचा पर्दाफाश करण्याचा प्रयत्न केला. याचदरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण–देशमुख यांनी प्रिया सरोदे यांच्या कानाखाली मारल्याची घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असल्याने या प्रकरणाची तातडीने आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

महिला पत्रकारावर गुन्हा दाखल; मात्र मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई कधी?

या घटनेनंतर प्रिया सरोदे यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करून एफआयआर नोंदविण्यात आल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे एकीकडे महिला पत्रकारावर गुन्हा दाखल होतो, तर दुसरीकडे महिला पत्रकाराच्या कानाखाली मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध काय कारवाई करण्यात आली, हा अत्यंत गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

**महिला पत्रकारावर गुन्हा दाखल; मात्र मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई कधी? वाशी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांना सवाल !**

एकाच घटनेकडे दोन वेगवेगळ्या मापदंडांनी पाहिले जात आहे का? असा सवालही सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे. कायदा सर्वांसाठी समान असेल, तर पोलीस अधिकारी असो किंवा सामान्य नागरिक– कायद्याचे उल्लंघन झाल्यास चौकशी आणि कारवाईची प्रक्रिया समान असली पाहिजे, अशी मागणी होत आहे.

कायद्याचे रक्षकच कायदा हातात घेणार असतील तर जनतेने विश्वास ठेवायचा कोणावर?

पोलीस प्रशासनाकडे नागरिक संरक्षणाची जबाबदारी असताना, पोलिसांकडूनच एखाद्या महिला पत्रकाराला सार्वजनिक ठिकाणी मारहाण झाल्याचा प्रकार घडत असेल, तर हा केवळ एका पत्रकाराचा प्रश्न नसून पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरील गंभीर प्रश्न असल्याची भावना सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

समाजमाध्यमांवर प्रसारित होत असलेल्या व्हिडिओची अधिकृत तपासणी करून संपूर्ण घटनेची सत्यता निश्चित करण्यात यावी. प्रत्यक्ष मारहाण झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधित महिला पोलीस अधिकाऱ्यावर तातडीने शिस्तभंगाची कारवाई करून निलंबन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी खुलासा करावा**

या संपूर्ण प्रकरणात वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांची भूमिका काय होती, याचाही खुलासा पोलीस प्रशासनाने करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. महिला पत्रकारावर गुन्हा दाखल होतो; मात्र महिला पत्रकाराला मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई होत नसेल, तर ही कारवाईची समानता कुठे आहे? असा थेट सवाल उपस्थित करून संबंधित अधिकाऱ्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**मलिकार्जुन पुजारी म्हणाले :** प्रिया सरोदे या महिला पत्रकारास मारहाण करणाऱ्या PI देशमुख–चव्हाण यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी. कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे. उद्या संध्याकाळपर्यंत संबंधित महिला पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन झाले नाही, तर हे आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल.

आता प्रश्न एकच–कायद्याचे रक्षण करणाऱ्या पोलिसांनाही कायदा पाळावा लागणार की पोलिसांसाठी वेगळा कायदा आहे? या प्रश्नाचे उत्तर पोलीस प्रशासनाने जनतेसमोर देण्याची मागणी जोर धरत आहे.

**निलंबनाच्या मागणीसाठी आंदोलनाचा इशारा**

सामाजिक कार्यकर्ते मलिकार्जुन पुजारी यांनी संबंधित महिला पोलीस अधिकाऱ्याच्या निलंबनाची मागणी केली असून, कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

## साप समजून घ्या, निसर्ग वाचवा; वन्यजीव सप्ताहात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

मवेशी (समर्थ गांवकरी)




सापांविषयी समाजात असलेली भीती, गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करून वन्यजीवांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज असल्याचे सर्पमित्र सचिन गिरी यांनी सांगितले. महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या वतीने आयोजित वन्यजीव सप्ताह २०२६ अंतर्गत मवेशी संकुलात सर्प जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गिरी यांनी विद्यार्थ्यांना सापांच्या विविध प्रजाती, त्यांचे अधिवास, विषारी व बिनविषारी साप आणि सर्पदंशाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

साप हा निसर्गातील अन्नसाखळीचा महत्त्वाचा दुवा आहे. उंदीर आणि इतर पिकनुकसान करणाऱ्या जीवांची संख्या नियंत्रणात ठेवण्यात सापांची भूमिका असल्याने शेतीच्या दृष्टीनेही त्यांचे महत्त्व आहे. त्यामुळे सापांना घाबरून त्यांना मारण्याऐवजी त्यांच्या पर्यावरणीय भूमिकेची माहिती करून घेणे आवश्यक असल्याचे गिरी यांनी स्पष्ट केले.

साप दूध पितात, सूड घेतात, माणसाला ओळखून ठेवतात यांसारख्या अनेक गैरसमजुती समाजात प्रचलित आहेत. अशा समजुतींना शास्त्रीय आधार नसल्याचे सांगत गिरी यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले. साप आढळल्यास त्याला त्रास देऊ नये किंवा स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये. सुरक्षित अंतर ठेवून प्रशिक्षित सर्पमित्रांची मदत घ्यावी. सर्पदंश झाल्यास कोणत्याही अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता तातडीने वैद्यकीय उपचार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने श्री स्वामी समर्थ विद्यालय, मवेशी येथेही सर्प जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सापांविषयी माहिती जाणून घेतली. यावेळी मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

मवेशी संकुलातील कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी डी. डी. पडवळे, वनपाल आर. एस. घोडसरे, वन विभागाचे सर्व कर्मचारी, केंद्रप्रमुख भांगरे सर, पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांच्यासह मवेशी संकुलातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच आयटीआयचे विद्यार्थी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद ठाणे येथे महात्मा गांधी जयंतीनिमित्त महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन

ठाणे (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद, ठाणे येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज, विविध उपक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा, स्वच्छता, स्वावलंबन आणि सामाजिक समतेच्या विचारांच्या माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला व्यापक दिशा दिली. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा आदर्श आजही समाजाला प्रेरणा देणारा आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देण्याचा संकल्प करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

सेवा संकल्प अभियान राबविण्याबाबत महात्मा गांधी यांनी 'स्वच्छता ही सेवा' विविध स्वच्छतेला केवळ वैयक्तिक सवय न मानता सामाजिक जबाबदारीचे स्वरूप दिले. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन स्वच्छता, आरोग्य, सामाजिक बांधिलकी आणि सार्वजनिक सेवेत प्रामाणिकपणा यांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.



यावेळी कनिष्ठ प्रशासन अधिकारी भिमा शेळके तसेच जिल्हा परिषदेचे विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित अधिकारी–कर्मचाऱ्यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या सत्य, अहिंसा, स्वच्छता व सेवाभावाच्या विचारांना आदरांजली अर्पण केली.

कार्यक्रमाच्या माध्यमातून महात्मा गांधी यांच्या विचारांचे स्मरण करत स्वच्छ, निरोगी, सक्षम आणि विकसित समाजनिर्मितीसाठी प्रत्येकाने आपापल्या स्तरावर योगदान देण्याचा संदेश देण्यात आला.

## अतिक्रमणामुळे विहिरीचा निम्मा भाग कोसळला

**दुर्घटनेचा धोका,तहसीलदारांच्या आदेशानंतरही कारवाई रखडल्याचा शेतकऱ्यांचा आरोप**

मंचर (समर्थ गांवकरी)



अवसरी खुर्द (ता.आंबेगाव) ग्रामपंचायत हद्दीतील गायमुख–भोरमळा–अवसरी खुर्द रस्त्यालगत असलेल्या शेतकऱ्यांच्या मालकीच्या विहिरीचा सुमारे निम्मा भाग शुक्रवार दि.२ रोजी पहाटे अचानक कोसळला. तहसीलदारांच्या आदेशानंतरही कारवाई रखडल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. ओढ्याच्या पात्रातील अतिक्रमणामुळे पावसाचे पाणी विहिरीच्या दिशेने वळल्याने परिसरातील जमीन भुसभुशीत होऊन विहीर खचल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

विहिरीच्या दक्षिण बाजूला ओढ्याच्या पात्रात सुमारे आठ ते दहा फूट रुंदीचे बांधकाम करण्यात आले आहे.या अतिक्रमणाबाबत निवृत्ती भोर यांच्यासह पाच शेतकऱ्यांनी २३ एप्रिल रोजी महसूल विभागाकडे तक्रार केली होती.सुनावणीनंतर नायब तहसीलदार डॉ.सचिन वाघ यांनी ९ जून रोजी अतिक्रमण हटविण्याचे आदेश मंचर मंडल अधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, आदेशानंतरही कार्यवाही झाली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.जुलैमध्ये झालेल्या अतिवृष्टीत ओढ्याचे पाणी पात्राबाहेर येऊन विहिरीला दोनदा वेढा पडला होता.

महसूल विभागाने अतिक्रमण हटविण्याचे स्पष्ट आदेश देऊनही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे विहिरीचा मोठा भाग कोसळला असून उर्वरित भागही धोकादायक स्थितीत आहे.अतिक्रमण तातडीने हटवावे.प्रसाद कराळे, सरपंच, अवसरी खुर्द.

## दुष्काळी परिस्थिती घोषित केलेल्या २६५ तालुक्यांतील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीसोबतच इतर मदतीसाठी विद्यापीठ स्तरावर टास्क फोर्स स्थापन करावा

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील**

मुंबई (समर्थ गांवकरी)



राज्यातील दुष्काळी परिस्थिती घोषित केलेल्या भागातील कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण आर्थिक अडचणींमुळे थांबू नये, याची काळजी घेणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. दुष्काळी परिस्थिती घोषित केलेल्या २६५ तालुक्यांतील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीसोबतच इतर मदतीसाठी विद्यापीठ स्तरावर टास्क फोर्स स्थापन करावा असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांचे कुलगुरू, प्र–कुलगुरू, कुलसचिव तसेच महाविद्यालयांच्या प्राचार्यांची ऑनलाइन आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीस विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी आणि उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, मदत व पुनर्वसन विभागाने राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित भागातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या परीक्षा शुल्क माफीबाबत उच्च शिक्षण संचालनालयाने परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये होणाऱ्या प्रथम सत्राच्या परीक्षांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, फक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी करून थांबू नये. अतिवृष्टीच्या काळात राबवलेल्या मेंटर–मेंटी योजनेप्रमाणे आताही पुढाकार घ्यावा. सक्षम महाविद्यालयांनी जास्त दुष्काळ असलेल्या भागातील महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांना मदतीचा हात द्यावा. उच्च शिक्षण क्षेत्राने याकडे औपचारिकता म्हणून न पाहता एक कुटुंब म्हणून या परिस्थितीचा सामना करावा.

विद्यापीठ स्तरावर टास्क फोर्स करावे : या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी उच्च शिक्षण संचालनालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करावा तसेच प्रत्येक विद्यापीठात टास्क फोर्स स्थापन करून महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी मदत कार्य सुरू करावे.

## मतदार यादी सुधारित वेळापत्रक जाहीर १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांसाठी मतदार नोंदणीची सुवर्णसंधी

**१२ ऑक्टोबरपर्यंत नोंदणीची मुदत; जिल्हाधिकाऱ्यांचे नागरिकांना आवाहन**

ठाणे (समर्थ गांवकरी)

भारत निवडणूक आयोग यांच्याकडील दि.२६ सप्टेंबर २०२६ रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार विशेष सखोल पुनरिक्षण (ड्खठ) कार्यक्रमाचे सुधारीत वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार दावे व हरकती सादर करण्यासाठी दि. ३१ ऑगस्ट २०२६ ते १२ ऑक्टोबर २०२६ अशी मुदतवाढ दिलेली असून अंतिम मतदार यादी दि.१६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिध्द करावयाची आहे.

गैरहजर / स्थलांतरित किंवा इतर कारणामुळे मतदार यादीत नाव समाविष्ट करु न शकलेल्या मतदारांना त्यांच्या सध्याच्या सर्वसाधारण रहिवासाच्या ठिकाणांहून मतदार यादीमध्ये नव्याने नाव अंतर्भूत करण्यास दावे व हरकतीच्या कालावधीमध्ये संधी उपलब्ध झालेली आहे. त्याच प्रमाणे ऑक्टोबर, २०२४ नंतर मतदार यादी पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात आला नसल्याने दिनांक ०१ ऑक्टोबर २०२४ नंतर १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदविता आले नव्हते. आता, दि.०१ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व नवमतदारांना मतदार यादीमध्ये नाव अंतर्भूत करण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे.

सुधारीत कार्यक्रमानुसार नवमतदार तसेच अन्यथा पात्र असून प्रारुप मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट न झालेल्या नागरिकांना मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करणे, मतदार यादीमधील अस्तित्वात असलेल्या नोंदीमध्ये सुधारणा करणे तसेच यादीतील नावाची वगळणी करणे यासाठी दावे व हरकतींचा कालावधी दि.३१ ऑगस्ट, २०२६ ते १२ ऑक्टोबर, २०२६ असा आहे. याच कालावधीत दावे व हरकती स्विकारण्यासाठी विशेष शिबीरांचे आयोजित करण्यात आलेले आहे.

ठाणे जिल्हयातील १८ विधानसभा मतदारसंघातील सर्व पदनिर्देशित ठिकाणी / मतदान केंद्रावर शनिवार, दि. ०३ ऑक्टोबर २०२६, रविवार, ०४ ऑक्टोबर २०२६ आणि शनिवार, दि.१० ऑक्टोबर २०२६, रविवार दि.११ ऑक्टोबर २०२६ या दिवशी विशेष शिबिरे आयोजित करण्यात आलेली आहेत. या कालावधीत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यत दावे व हरकती मतदारांना दाखल करता येतील. (नाव सामाविष्ट करण्यासाठी नमुना–६, दुरूस्तीसाठी नमुना–८, वगळणीसाठी नमुना–७) (त्यासोबत घोषणापत्र व आवश्यक कागदपत्रासह) या शिबिरांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इड्ज) यांच्याबरोबर मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (इड) यांना उपस्थित राहण्याच्या सूचना संबंधित राजकीय पक्षांमार्फत देण्यात आल्या आहेत. तसेच या विशेष शिबिरांमध्ये महिला तसेच दिव्यांगांच्या समावेशनासाठी विशेष प्राधान्य देण्यात आलेले आहे.




जिल्हयातील पात्र नागरिकांनी मतदार नोंदणी करणेसाठी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

# चव्हाण परिवारावर दुःखाचा डोंगर

## सईंद्राबाई चव्हाण यांच्या निधनाने कुटुंबीयांसह परिसर हळहळला!



: लेखन :
डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

**पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील वडज येथील प्रगतिशील शेतकरी, कष्टाळू आणि प्रेमळ स्वभावाच्या गं.भा. कै. सईंद्राबाई मार्तंड चव्हाण (वय ७५) यांच्या निधनाने चव्हाण, पारखे आणि नवले परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या निधनाने परिवारातील सदस्यांसह नातेवाईक, मित्रपरिवार आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. सईंद्राबाई यांचे माहेर ऊच्छील येथील असून, गं.भा. कै. सईंद्राबाई भीमाजी नवले यांच्या त्या कन्या होत. पारखे, चव्हाण आणि नवले परिवारातील जिव्हाळ्याचे संबंध त्यांनी आयुष्यभर जपले. जानकु सखाराम पारखे बाबा यांच्या नेतृत्वाखालील या परिवारातील मामा-भाचे, भाऊ-बहिणी आणि नातेवाईकांचे संबंध केवळ रक्ताच्या नात्यापुरते मर्यादित न राहता प्रेम, आपुलकी आणि परस्पर सहकार्याच्या बंधनाने जोडले गेले होते.**








- **गोठ्यातील गाय हरपली, माणसातली माय हरपली; सईंद्राबाई चव्हाण यांच्या निधनाने परिवार शोकसागरात!**
- **संघर्षातून परिवार घडविणारी माऊली काळाच्या पडद्याआड; सईंद्राबाई चव्हाण यांना भावपूर्ण श्रद्धांजली**
- **४ ऑक्टोबर रोजी दशक्रिया विधी कार्यक्रम!**

सईंद्राबाई यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संसार उभा केला. घरची आर्थिक परिस्थिती नाजूक असतानाही त्यांनी आपल्या पती मार्तंड चव्हाण यांच्या खांद्याला खांदा लावून शेती तसेच संसाराची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. पार्वताबाई यांनीही कुटुंबातील तीन सुनांना आपल्या मुलांप्रमाणे सोबत घेत संसार उभा करण्यासाठी मोठे योगदान दिले. सईंद्राबाई यांनी कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही. चार मुले लता, सुनील, नवनाथ आणि छाया यांना त्यांनी प्रेम, संस्कार आणि कष्टाची शिकवण देत घडविले. जुन्नर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील अनेक कुटुंबांना त्यांनी आपल्या परीने आधार दिला. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देताना कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता अनेकांना मदतीचा हात दिला. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला सामाजिक जिव्हाळ्याची आणि माणुसकीची किनार लाभली होती.

त्यांच्या संस्कारातून उभा राहिलेला परिवार आज विविध क्षेत्रांत आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. लता या पिंपळगाव घोलप येथे कार्यरत असून, सुनील शेती क्षेत्रात कार्यरत आहेत. नवनाथ चव्हाण यांनी भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून सार्वजनिक जीवनात काम करत घाटकोपर परिसरात आपली ओळख निर्माण केली आहे, तर छाया या वकिली व्यवसायात कार्यरत आहेत. परिवारातील दशरथ चव्हाण यांनी नवी मुंबई येथे आदर्श इंजिनिअरिंग कंपनीची स्थापना करून कोकण विभागातील पाच जिल्ह्यांतील अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. ग्रामीण भागातील जनतेशी असलेली नाळ कायम जपत सुख-दुःखात सहभागी होण्याचा त्यांचा स्वभाव असून, ते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तसेच दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या माध्यमातूनही कार्यरत आहेत. मंगेश चव्हाण हेही शेती क्षेत्रात कार्यरत आहेत. सईंद्राबाई यांनी आपल्या मुलांसह पुढील पिढीलाही कष्ट, माणुसकी, एकजूट आणि समाजाशी बांधिलकीची शिकवण दिली.

सईंद्राबाई यांच्या निधनाने केवळ एक कुटुंबातील माय हरपली नाही, तर अनेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारी एक प्रेमळ व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेली आहे. त्यांच्या आयुष्याचा प्रवास हा संघर्षातून उभ्या राहिलेल्या कुटुंबासाठी प्रेरणादायी ठरला आहे. त्यांनी परिवाराला दिलेली दिशा, संस्कार आणि माणुसकीची शिकवण ही पुढील पिढ्यांसाठी कायम स्मरणात राहणार आहे. आज त्यांच्या जाण्यानंतर घरातील प्रत्येक कोपरा त्यांच्या आठवणींनी भरून गेला असून, लेकरांच्या डोळ्यांत अश्रू आणि मनात आईच्या आठवणींचा काहूर आहे. गेले ते दिवस, राहिल्या त्या आठवणी... गोठ्यातील गाय हरपली, माणसातली माय हरपली... या भावनेतून चव्हाण परिवाराचे दुःख शब्दांत व्यक्त करणे कठीण झाले आहे. त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली.

# जिल्हा बँकेच्या रणांगणात दाते-गायकवाडांची एन्ट्री

## बिनविरोधासाठीही चर्चेचा सूर!

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातून आमदार काशिनाथ दाते यांनी विविध कार्यकारी सेवा सोसायटी मतदारसंघातून गुरुवारी (दि. १) उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्यासोबत जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड यांनी बिगरशेती मतदारसंघातून, तर सौ. सोनल गायकवाड यांनी महिला राखीव मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी महायुतीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे पारनेरमधून जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी महायुतीची ताकद दाखविण्याचा प्रयत्न झाल्याचे चित्र दिसून आले.




मात्र, अर्ज दाखल केल्यानंतर आमदार दाते यांनी निवडणुकीबाबतची पुढील भूमिका महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांच्या निर्णयानुसारच राहणार असल्याचे स्पष्ट केले. जिल्हा बँक ही शेतकरी व सहकार क्षेत्राशी संबंधित महत्त्वाची संस्था असल्याने निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सुरू असलेल्या चर्चेलाही त्यांनी दुजोरा दिला.

संगमनेर येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याबाबत चर्चा झाल्याचे दाते यांनी सांगितले. त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतरही निवडणुकीचे अंतिम चित्र वरिष्ठ पातळीवरील चर्चेनंतरच स्पष्ट होणार असल्याचे संकेत मिळाले. महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांचा निर्णय अंतिम; शेतकरीहितासाठी बिनविरोधाच्या चर्चेलाही दुजोरा अशी भूमिका आमदार दाते यांनी यावेळी स्पष्ट केली.

# सेवाभावातून नेतृत्वगुण व राष्ट्रीय एकतेची जडणघडण; तरुणांनी समाजसेवेत योगदान द्यावे

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि राष्ट्रीय एकतेची भावना विकसित करण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, राष्ट्रीय एकता, बंधुभाव आणि समाजाप्रती सेवाभावना विकसित होते. केवळ शैक्षणिक ज्ञान मिळविण्याबरोबरच विद्यार्थ्यांनी समाजाच्या विविध घटकांशी जोडले जाऊन सामाजिक कार्यात योगदान देणे आवश्यक आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी तरुण पिढीने सेवाभावनेने कार्य करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. देवेंद्र बहिरम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास आणि तिच्या



कार्याचा उद्देश स्पष्ट केला. श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि समाजसेवा ही राष्ट्रीय सेवा योजनेची प्रमुख मूल्ये असून, विद्यार्थ्यांनी या मूल्यांचा अंगीकार करून समाजोपयोगी कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, बी.सी.एस. विभागप्रमुख श्रीमती वारे, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. बुलाखे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. संजय फटे यांनी केले. विज्ञान विभागप्रमुख सौ. उषा बोरुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या वेशभूषेत १५७ विद्यार्थ्यांची प्रभात फेरी

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

वेगवेगळ्या ५०० राजांच्या अधिपत्याखाली असलेल्या देशाला एकत्र आणण्याचे काम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी केले असून बलाढ्य जुलमी ब्रिटिशांविरुद्ध भारतातील गोरगरीब सर्व जाती धर्मातील नागरिकांना एकत्र करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. नैतिकता व निर्भयता ही त्यांची तत्व जगासाठी अनुकरणीय असून संपूर्ण जगामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यामुळे भारताची मोठी ओळख निर्माण झाली असल्याचे गौरवोद्गार जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी काढले असून. महात्मा गांधी यांच्या वेशभूषेतील १५७ विद्यार्थ्यांनी काढलेल्या प्रभात फेरीने संगमनेर दुमदुमले.

जयहिंद लोकचळवळीच्या राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त प्रभात फेरी व गांधी भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन जनसंपर्क कार्यालयापासून १५७ विद्यार्थ्यांच्या गांधी वेशभूषेतील प्रभात फेरी व गांधी भजनांनी संगमनेर शहर आज दुमदुमले.

संगमनेर बसस्थानकावर गांधी भजन व अभिवादनाचा मुख्य कार्यक्रम झाला. यावेळी मा.आमदार डॉ. सुधीर तांबे, सौ दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, प्रा हिरालाल पगडाल, डॉ नामदेवराव गुंजाळ, प्रा बाबा खरात, प्रा प्रकाश पारखे, डॉक्टर बाळासाहेब वाघ, एस एम खेमनर, ड मधुकर गुंजाळ यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

संगमनेर बसस्थानकावर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची सुंदर रांगोळी तुषार भोसले यांनी काढली. तर सुगंध जाधव यांनी त्यांचे चित्र रेखाटले. याचबरोबर ओंकार मोरे व कृष्णा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांसमोर महात्मा गांधी यांची मूर्ती बनवली.

यावेळी बोलताना मा आ डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री हे देशाचे सुपुत्र भारतरत्न आहेत. जगामध्ये महात्मा गांधी आणि गौतम बुद्ध यांच्यामुळे भारताची ओळख निर्माण

- **राष्ट्रपिता महात्मा गांधीमुळे जगात देशाची ओळख : मा.आ. डॉ सुधीर तांबे**
- **संगमनेर मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी**

झाली आहे. अहिंसा आणि सत्य हे तत्व त्यांनी दिले. पाचशे विविध राज्यांमध्ये विभागलेला देश एकत्र आणण्याचे काम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी केले असून जात-पात धर्म विसरून स्वातंत्र्य लढ्यामध्ये सर्वांना एकत्र केले .असहकार चळवळ, मिठाचा सत्याग्रह,चलेजाव आंदोलन ही त्यांची मोठी आंदोलन होती. मात्र विविध २१ सामाजिक चळवळी सुद्धा त्यांनी केल्या हे त्यांचे वेगळेपण आहे.

नैतिकता व निर्भयता ही त्यांची शक्ती स्थळे होती. आज देशामध्ये सत्य आणि






असत्याची लढाई सुरू आहे. गांधीजींबद्दल काही लोक अपप्रचार करत आहेत. परंतु गांधीजींचे विचार कधीही मारले जाणार नाही . जगात शांतता व आनंद निर्माण होण्यासाठी गांधी विचार गरजेचे आहे .

दुर्दैवाने देशातले सध्याचे सत्ताधारी यांच्याकडे नैतिकता नसल्याची खंत व्यक्त करताना गांधी विचार हा शाश्वत मानवतेचा विचार असून हा विचार जपण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध रहावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रा. हिरालाल पगडाल म्हणाले की जगामध्ये बुद्ध आणि गांधींच्या विचारांची गरज आहे. सौ दुर्गाताई तांबे म्हणाल्या की लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात गांधी विचार पुढे नेण्यासाठी आपण कटिबद्ध राहूया

तर प्रा. विनोद राऊत, अविनाश कदम, गणेश गोरडे मंगेश बिडवे सौरभ रणधीर यांनी रघुपती राघव राजाराम, वैष्णव जनतो, आज का दिन बडा महान ,भारत के दो फुल खिले जिसमे महेका हिंदुस्तान, माझे माहेर पंढरी, देदी हमे आजादी, किया हम पे अहसान यांसह राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आवडणारी विविध भजने सादर केली. या भजनांमध्ये उपस्थित सर्वांनी सहभाग घेतला.

यावेळी सुरेश झावरे, निखिल पापडेजा, अनंत शिंदे, हर्षल थेटे, चांगदेव खेमनर यांच्यासह विविध पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाची प्रास्ताविक प्रा. प्रकाश पारखे यांनी केली सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले तर डॉ. नामदेवराव गुंजाळ यांनी आभार मानले. याप्रसंगी संगमनेर शहरातील नागरिक विद्यार्थी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जगात असे एकच न्यायालय आहे, जिथे सर्व गुन्हे माफ होतात,
आणि ते म्हणजे आईचे हृदय.

# भावपुर्ण श्रध्दांजली

# कै.गं.भा.सईंद्राबाई मार्तंड चव्हाण

माहेरचे नाव :- सईंद्राबाई भिमाजी नवले (उच्छिल)



आता सहवास जरी नसला तरी, स्मृति सुगंध देत राहील ।
जीवनाच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुमची येत राहिल..।।

## भावपूर्ण श्रध्दांजली

✻ शोकाकुल ✻

---

# ADARSH
## ENGINEERING SERVICES
GENERATOR SALES & SERVICE

**मा. दशरथ चव्हाण**
नवी मुंबई, जिल्हाध्यक्ष
महा.रा.प.संघ,मुंबई



Mo.8286562340, 9004511593 / 022 65181666
Off.: 203, Kokan Apartment, Plot No. 1053,
Sector- 5, Koparkhirne, Navi Mumbai- 400709.
E-mail : dasharathschavan@gmail.com
website: www.adarshengineering.net

---

समाजरत्न
# मा.नानजीभाई
## खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला)
श्रीम.धनलक्ष्मीबेन नानाजीभाई ठक्कर (ठाणावाला)

- शेठ एन. के. टी. ठाणावाला चॅरीटेबल ट्रस्ट
- एन. के. टी. कॉलेज
- ठाणे जिल्हा व्यापारी महामंडळ
- ठाणे जिल्हा गुजराती समाज
- श्री कच्छ वागड लोहाणा महाजन

अध्यक्ष

एन.के.टी. कॉलेज,
खारकर आळी, ठाणे (प.)
Tel. 25389999, 25416944,
Website : www.nkttrust.com

---

## सौ. परिधा विश्वासराव आरोटे
चेअरमन : मुक्ताई सहकारी मंजुर संस्था, अकोले
संचालिका : विविध कार्य सेवा सोसायटी, चितळवेढे
संचालिका : महिला ग्रा.वि.शेती.सह पतसंस्था, अकोले
उपाध्यक्ष : आदर्श महिला विकास संस्था, अकोले
उपाध्यक्ष : आदर्श महिला विकास संस्था, अकोले

## डॉ.विश्वास आनंदराव आरोटे
प्रदेश सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई
संपादक : दैनिक समर्थ गांवकरी
संपादक : AVP NEWS Channel
संपादक : समर्थ गांवकरी NEWS Channel
संचालक : अकोले ग्रा.बि.शे.सह.पतसंस्था मर्या; अकोले
मोबा.९४२३३८८५०८/९४२३४६७२७२

---

राज्यातील, जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व पत्रकार सभासद
## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ;मुंबई
संपादक, उपसंपादक, व्यवस्थशपक तसेच सर्व वार्ताहर, प्रतिनिधी व वितरक
## दै.समर्थ गांवकरी समुह

---



**डॉ.विश्वासराव आरोटे**
(प्रदेश सरचिटणीस)



**मा. नवनाथ जाधव**
कार्य. संपादक, समर्थ गांवकरी
प्रदेश प्रसिध्दी प्रमुख,
म.रा.प.संघ, मुंबई



**मा. दशरथ चव्हाण**
संपादक, नवी मुंबई
जिल्हाध्यक्ष, म.रा.प.संघ, मुंबई



**मा. संजय फुलसुंदर**
व्यवस्थापक,
दै. समर्थ गांवकरी

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## ज्येष्ठांच्या अनुभवातून नव्या पिढीला प्रेरणा मिळावी : गणेश इवनाते



**मंचर (समर्थ गांवकरी)**

ज्येष्ठ नागरिकांच्या अनुभवांचा आणि सामाजिक योगदानाचा सन्मान व्हावा,त्यांच्या अनुभवातून नव्या पिढीला प्रेरणा मिळावी, यासाठी सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत, अशी माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते यांनी दिली. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव यांच्या वतीने सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचारी संघटनेच्या सहकार्याने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. इंग्रजी माध्यमाच्या शासकीय आश्रमशाळेत झालेल्या कार्यक्रमास एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते, सहायक प्रकल्प अधिकारी प्रियंका घनवट, संदीप पाटील, रुषाली घैसास, ज्येष्ठ नागरिक, अधिकारी, कर्मचारी तसेच संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनानुभवातून समाजाला मिळणारे मार्गदर्शन, त्यांचे सामाजिक योगदान आणि नव्या पिढीला त्यांच्या अनुभवातून मिळणारी प्रेरणा यावर यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.इंग्रजी माध्यमाच्या शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक गणेश गावडे यांनी कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन केले.प्रास्ताविक प्रियंका घनवट यांनी केले.यावेळी सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भारत शिंदे, उपाध्यक्ष हनुमंत काळे, सचिव दादाभाऊ लोहकरे, सहसचिव विठ्ठल चव्हाण आदी उपस्थित होते.

## तालुकास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत श्री विवेकानंद विद्यामंदिरला अजिंक्यपद




**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय व पाथर्डी तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यामाने तालुकास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा फ्लाइंग बर्ड स्कूल पाथर्डी येथे नुकत्याच संपन्न झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन प्रांताधिकारी प्रसाद मते, नगराध्यक्ष अभय आव्हाड, मृत्युंजय गर्जे,दीपक देशमुख, पाथर्डी तालुका क्रीडा पदाधिकारी तसेच पाथर्डी तालुक्यातील सर्व क्रीडाशिक्षक यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या स्पर्धेत पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद विद्यामंदिर पाथर्डी मधील १४ वर्षे वयोगट मुले व १७ वर्षे वयोगट मुले या गटातील खेळाडूंनी प्रथम क्रमांक पटकावून अजिंक्यपद पटकाविले. या दोन्ही संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. विद्यालयातील दोन्ही संघ पाथर्डी तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.१४ वर्षे वयोगट मुली,१७ वर्षे वयोगट मुली व १९ वर्षे वयोगट मुले या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. स्पर्धेत एकूण २८ संघाने सहभाग नोंदविला. यशस्वी संघातील खेळाडूंचे पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पार्थ नगरीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष एडवोकेट सुरेशराव आव्हाड,विश्वस्त कुणाल आव्हाड, मुख्याध्यापक शरद मेढे,समन्वयक ज्ञानेश्वर गायके,पर्यवेक्षक संपत घारे ,पालक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक सतीश डोळे, गौरव दाणे, प्रमोद हंडाळ, भैया थोरात, मनोज ढाकणे,कार्तिक कराड यांचे मार्गदर्शन लाभले.

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयात श्रमदान व स्वच्छता मोहीम




**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) वतीने श्रमदान व स्वच्छता जनजागृती अभियान उत्साहात संपन्न झाले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रामध्ये स्वच्छता, सामाजिक बांधिलकी आणि नागरी जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने श्रमदान व स्वच्छता जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले होते. या अभियानांतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे श्रमदान करून परिसराची स्वच्छता केली. परिसरातील कचरा, प्लास्टिक व अनावश्यक वस्तू जमा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. तसेच छात्रांनी स्वच्छता राखण्याबाबत जनजागृती केली. स्वच्छ परिसर, सुंदर परिसर–हीच आपली नागरी जबाबदारी हा संदेश विद्यार्थ्यांनी शहरातील नागरिकांना दिला. स्वच्छता ही केवळ शासनाची किंवा स्थानिक प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहिमेचे आयोजन महाविद्यालय परिसरात करण्यात आले.

# शासकीय सेवा नागरिकांच्या दारी;विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध

## शेलार येथे आयोजित ‘सेवा संकल्प’ शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील यशस्वी कारकीर्दीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने तसेच सेवा परमो धर्मः या उदात्त भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत विविध शासकीय सेवा, सुविधा व कल्याणकारी योजनांचा लाभ सुलभ व पारदर्शक पद्धतीने पोहोचविण्यासाठी राज्य शासनामार्फत दि. १७ सप्टेंबर २०२६ ते दि.१७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान संपूर्ण राज्यभरात अत्यंत उत्साहात राबविण्यात येत आहे. याच अभियानाचा एक भाग म्हणून, दि. ०१ ऑक्टोबर २०२६ रोजी ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, भिवंडी प्रांताधिकारी अमित सानप तसेच तहसिलदार अभिजीत खोले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय अधिकारी व तहसिलदार कार्यालय, भिवंडी यांच्या संयुक्त विद्यमाने मंडळ शेलार अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय, शेलार येथील सभागृहात मंडळस्तरीय विशेष ’सेवा संकल्प’ शिबिराचे अतिशय नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले. या अभियानाला यशस्वी करण्यासाठी जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या शिबिरास महसूल नायब तहसिलदार आदेश म्हात्रे, ग्राम पंचायत सदस्य श्री. दीपक जनार्दन भोईर, श्री. विलास गोविंद रापटे, सामाजिक कार्यकर्ते श्री. भरत नामदेव भोईर आणि ग्रामपंचायत सदस्य श्री. दशरथ बाळू भोईर आदी मान्यवर आवर्जून उपस्थित होते. तसेच शेलारचे मंडळ अधिकारी श्री. धनंजय आर. वतारी, सहाय्यक मंडळ अधिकारी श्री. किरण केदार, महसूल सहाय्यक श्री. आनंद तिवाड, ग्राम महसूल अधिकारी श्री. रुपेश कारभारी, श्रीमती शारदा घोलप, श्रीमती दीप्ती जाधव, महसूल सेवक, कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय भिवंडी येथील कर्मचारी, ग्रामपंचायत विभागाचे कर्मचारी आणि संबंधित विविध शासकीय विभागांचे अधिकारी–कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी अत्यंत प्रभावी समन्वय साधत नागरिकांच्या अडचणी थेट समजून घेतल्या. या शिबिरादरम्यान महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाशी संबंधित विविध सेवा, दाखले आणि शासकीय कागदपत्रांचे प्रत्यक्ष वाटप करण्यात आले.

दिवसभरात पार पडलेल्या या शिबिरात महसूल विभागांतर्गत ७६ सातबारा उतारे, २५ फेरफार उतारे, १४ आठ–अ उतारे, २७ नमुना ७/इ व १२/इ (वनपट्टे) उतारे, ०४ नकाशा नक्कली, ०३ माहितीचा अधिकार अर्ज तसेच ०२ गावठाण सनदींचे वाटप करण्यात आले. याशिवाय १२ वनपट्टे घधउ, महिला शेतकरी योजनेचे १६ लाभ, १२ पाणंद रस्ते विषयक कामे, ०१ कलम ४३ सुधारणा प्रकरण आणि ०२ ग्रीस्टॅक फार्मर आयडी जनरेट करण्यात आले.

ग्रामपंचायत विभागामार्फत ०५ मृत्यू दाखले, ०२ विवाह नोंदणी प्रमाणपत्रे आणि १४ रहिवासी दाखल्यांचे त्वरित वाटप करण्यात आले.

कृषी विभागाकडून महाकृषी पबाबत १२ तर महाविस्तार पबाबत ०३ शेतकऱ्यांना मार्गदर्शन व नोंदणी सुविधा पुरविण्यात आली.



या शिबिरामध्ये महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना थेट व सोप्या भाषेत देण्यात आली. नागरिकांच्या विविध अडचणी व प्रलंबित प्रश्नांवर संबंधित अधिकाऱ्यांनी जागेवरच योग्य ती कार्यवाही आणि मार्गदर्शन केले.

मंडळ शेलार परिसरातील नागरिक, शेतकरी बांधव व सर्वसामान्य लाभार्थ्यांना महसूलविषयक कागदपत्रे, दाखले व शासकीय सुविधा एकाच छताखाली उपलब्ध झाल्याने वेळ व श्रमाची मोठी बचत झाली. पंचक्रोशीतील नागरिकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली.

शासकीय सेवा थेट नागरिकांच्या दारी पोहोचवून कारभारात सुलभता, गती आणि पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने आयोजित केलेले हे सेवा संकल्प शिबिर सर्वसामान्य जनतेसाठी अत्यंत उपयुक्त आणि समाधानकारक ठरले आहे. जनतेने व्यक्त केलेल्या कृतज्ञतेच्या भावना ऐकून उपस्थित अधिकाऱ्यांनाही लोकोपयोगी काम केल्याचे मनापासून समाधान लाभले.

# निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.सोपान निकम यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**




समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ लॉ कॉलेज, बेल्हे (बांगरवाडी), ता.जुन्नर येथे कायद्याचेशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्थेतील व्यावसायिक नीतिमत्ता,न्यायालयीन शिस्तआणि कायदेविषयक जबाबदाऱ्यांची जाणीव व्हावी,या उद्देशाने ‘व्यावसायिक नीतिशास्त्र व न्यायालय अवमान कायदा’ या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. पुणे येथील निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश सोपान निकम यांनी प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूटचे विश्वस्त वल्लभ शेळके,समर्थ लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील कवडे,ड. सुधीर कोकाटे,ड.अभिषेक भागवत,हरिओम ब्रह्मे,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, समर्थ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्याल याचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,प्रा.शिवाजी कुमकर तसेच समर्थ लॉ कॉलेजमधील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता.

कायद्याच्या क्षेत्रात केवळ कायद्याचे पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून त्यासोबत व्यावसायिक नीतिमत्ता, न्यायालयीन शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि आपल्या कर्तव्यांची जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे असे प्रतिपादन निकम यांनी केले.वकिली हा केवळ व्यवसाय नसून न्यायव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे वकिलांनीन्यायालयीन प्रक्रियेत आपली भूमिका जबाबदारीने आणि नैतिक मूल्यांचे पालन करून पार पाडणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्राचार्य डॉ. सुनील कवडे यांनी वकिलांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, न्यायालयीन शिस्त,न्यायालयीनकामकाजातील आचारसंहिता, न्यायालयाचा अवमान कायदा तसेच न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेचे संरक्षण याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. न्यायालयीन कामकाजामध्ये प्रत्येककृतीचा न्यायव्यवस्थेवर परिणाम होत असतो.

त्यामुळेकायद्याच्याविद्यार्थ्यांनी भविष्यातन्यायालयीन क्षेत्रात काम करताना कायद्याचे पालन करण्या बरोबरच न्यायालयाचा सन्मान व्यावसायिक आचारसंहितेचे भान ठेवले पाहिजे,असे त्यांनी सांगितले.

# मंचरमध्ये महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू

**मंचर (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मंचर शहरातील जनसेवक संजय थोरात यांच्या जनसेवा जनसंपर्क कार्यालयात बुधवार, दि. ३० सप्टेंबरपासून अर्ज भरण्यास सुरुवात करण्यात आली.या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून कार्यालयात महिलांची गर्दी झाली होती. शेतीच्या कामात प्रत्यक्ष योगदान देणाऱ्या महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून अधिकृत ओळख मिळावी तसेच विविध शासकीय कृषी योजनांचा लाभ घेणे सुलभ व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.महिला शेतकरी प्रमाणपत्रामुळे कृषी योजना, अनुदाने, कृषी निविष्ठा, प्रशिक्षण तसेच इतर कृषी सेवांचा लाभ घेण्यास पात्र महिलांना मदत होणार आहे.इच्छुक महिलांनी आधार कार्ड, मतदान कार्ड, अद्ययावत सातबारा, आठ–अ उतारा, रहिवासी दाखला, पासपोर्ट आकाराचा फोटो व स्वयंघोषणापत्र घेऊन कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहन नवनाथ थोरात यांनी केले.

# भागडीच्या गोपाळ गवारी यांचे ३५ हजार क्रेट टोमॅटो उत्पादनासाठी सन्मान



**मंचर (समर्थ गांवकरी)**

आदर्शगाव भागडी (ता.आंबेगाव) येथील सरपंच आणि प्रगतशील शेतकरी गोपाळ लक्ष्मण गवारी व त्यांच्या परिवाराने चालू वर्षात जुन्नर तालुक्यात सर्वाधिक जवळपास ३५ हजार क्रेट टोमॅटोचे उत्पादन घेतल्याबद्दल कृषी उत्पन्न बाजार समिती, जुन्नरच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

आमदार शरद सोनावणे, माजी आमदार अतुलशेठ बेनके आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजयशेठ काळे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.यावेळी कोंडीभाऊ गवारी, राजेंद्र गवारी, संदीप अदक, अर्जुन बराटे, दिनकर उंडे, प्रवीण गवारी, राम गवारी व योगेश गवारी उपस्थित होते.गोपाळ गवारी यांनी जूनच्या पहिल्या आठवड्यात सिजेंटा कंपनीच्या १०८ जातीच्या टोमॅटोची साडेसात एकर क्षेत्रावर लागवड केली. सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात विराण जातीची साडेतीन एकरांवर, तर जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात आठ एकरांवर लागवड केली.टोमॅटोला सरासरी २०० ते ५०० रुपये बाजारभाव मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

> **टोमॅटो उत्पादनासाठी योग्य नियोजन, दर्जेदार रोपे, वेळेवर औषधोपचार आणि पाण्याचे व्यवस्थापन केले. बाजारभाव चांगला मिळाल्याने उत्पादन खर्च वसूल होऊन समाधानकारक उत्पन्न मिळाले. कृषी बाजार समितीने केलेला सन्मान आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. गोपाळ गवारी, सरपंच भागडी.**

# श्री काळभैरवनाथ जेष्ठ नागरिक संघाचा जागतिक दिन साजरा

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रात १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून मोठ्या उत्साहात १ ऑक्टोबर रोजी उदापुर येथील विठ्ठलरुक्मिणी सभागृहात साजरा करण्यात आला. यावेळी श्री गणेश व श्री कालभैरवनाथ यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली शासन निर्णय नुसार महाराष्ट्रात सर्व ठिकाणी १ ऑक्टोबर रोजी हा दिवस शासकीय व निमशासकीय स्तरावर साजरा करण्याचे निर्देश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिले आहेत.त्यानुसार या कार्यक्रमाचे आयोजन उदापुरच्या जेष्ठ नागरिक संघाने आयोजित केला होता. कार्यक्रम अध्यक्ष म्हणून भागूजी कुलवडे होते.

यावेळी सूत्रसंचालक

प्रा.डॉ. विठ्ठल शिंदे यांनी प्रस्तावना करताना जेष्ठांच्या विविध प्रकारच्या शासकीय तसेच सामाजिक संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली यावेळी उदापुर ग्राम विकास मंडळाच्या वतीने श्री काळभैरवनाथ जेष्ठ नागरिक संघाच्या सर्व पदाधिकारी व संचालक मंडळाचे सत्कार करण्यात आले.त्यानंतर जेष्ठ नागरिक संघाने उदापुर गावातील पत्रकार बंधू,प्रभावी व्यक्ती, तसेच जेष्ठ महिला व पुरुषांचे शाल,श्रीफळ आणि गुलाबपुष्प देऊन सत्कार केले

यावेळी विद्या विकास मंडळा चे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी सर्व जेष्ठांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

**पुस्तक प्रकाशन**

उदापूरचे सुपुत्र व बहुआयामी व्यक्तिमत्त कवी,लेखक, समीक्षक,पत्रकार,समाजसेवक आणि मानवाधिकार विषयावर काम करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी विविध क्षेत्रांत आपला




ठसा उमटवणारे तसेच राष्ट्रपती पुरस्कार विजेते डॉ.खं.र. माळवे अर्थात खरमा लिखित

गणेशाय नमः या काव्यसंग्राहा चे जागतिक जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून जेष्ठ पत्रकार व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र भोर,श्री काळ भैरवनाथ जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भागूजी कुलवडे, उपाध्यक्ष वसंत शिंदे,सेक्रेटरी सखाराम तांबोळी, सहसचिव डॉ.विठ्ठल शिंदे,खजिनदार सावळेराम आरोटे,सहखजिन दार रामदास शिंदे,भीमराव माळवे,छबुराव शिंदे, बाळ– कृष्ण शिंदे यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे पुरस्कार विजेते आडतदार रोहिदास शिंदे,ग्रामविकास मंडळ अध्यक्ष संजीव शिंदे, आडतदार संतोष होनराव, तुळशीराम शिंदे,सरपंच सचिन आंबडेकर,मोहन वलव्हणकर,गणपत शिंदे, बबन शिंदे,माजी नायब तहसीलदार बबन अमूप तसेच अनेक जेष्ठ नागरिक महिला व पुरुष उपस्थित होते कार्यक्रम उपस्थितांचे आभार बबन चौधरी सर यांनी मानले

# व्यक्तीद्वेषातून बिनविरोधाचा घाट घातला तर जिल्हा बँक निवडणूक होणारच!

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकऱ्यांची ‘कामधेनू’ म्हणून ओळखली जाते. जिल्ह्यात सध्या दुष्काळाची गंभीर परिस्थिती असून शेतकरी मोठ्या संकटातून जात आहे. अशा परिस्थितीत जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होणे गरजेचे आहे. निवडणूक सर्वसंमतीने बिनविरोध होत असेल तर त्याचे निश्चितच स्वागत केले पाहिजे. मात्र, व्यक्तीद्वेषातून किंवा एखाद्याला डावलून निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला, तर ती बिनविरोध होणार नाही, अशी स्पष्ट भूमिका खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केली.

जिल्हा बँक निवडणुकीसाठी खा. नीलेश लंके यांनी गुरुवारी (दि. १) पारनेर सोसायटी मतदार संघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली. निवडणूक ही ठरवून करण्यासारखी गोष्ट नसते. वेळप्रसंगी निर्णय घेतले जातात आणि त्यानुसार निवडणुकीला सामोरे जावे लागते. माझ्यासोबत नेहमीच अनेकजण असतात. त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करताना झालेली गर्दी हे शक्तिप्रदर्शन नाही. शक्तिप्रदर्शन करायचे असते तर हजारो लोक आणले असते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध झाली पाहिजे, याबाबत आमचे सर्वांचेच एकमत आहे. महाविकास आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली असून, निवडणूक बिनविरोध होत असेल तर त्याचे स्वागत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, यासाठी प्रमुख मंडळींनी आपापले मतभेद बाजूला ठेवून एकत्र बसून चर्चा करण्याची गरज आहे. सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला तर बिनविरोध निवडणुकीचा मार्ग मोकळा होऊ शकतो. परंतु व्यक्तीद्वेषातून निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न केला तर त्याला आपला विरोध राहील, असे लंके यांनी सांगितले.

ज्या शेतकऱ्यांसाठी जिल्हा बँक काम करते, तोच शेतकरी सध्या अडचणीत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत संस्थेची निवडणूक लावणे योग्य बाब नाही. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून सर्वांनी सामंजस्याची भूमिका घ्यावी, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठी कोणाचा अजेंडा अथवा उमेदवार निश्चित झाला आहे का, असा प्रश्न विचारण्यात आला असता अध्यक्षपदाचा निर्णय निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होईल, असे लंके यांनी सांगितले. सध्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर आणि उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतरच बिनविरोध निवडणुकीचे खरे चित्र स्पष्ट होईल. निवडून आलेल्या संचालक मंडळात बहुमत कोणाच्या बाजूने आहे, त्यानुसार अध्यक्षाची निवड केली जाते. त्यामुळे आताच अध्यक्षपदाचा उमेदवार ठरला आहे, असे म्हणता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. पालकमंत्री जामखेड तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करीत असल्याबाबत बोलताना लंके यांनी सरकारकडून दुष्काळग्रस्तांना तातडीने ठोस मदत देण्याची मागणी केली. दुष्काळग्रस्त भागाची पाहणी झालीच पाहिजे. राज्याच्या प्रमुखांनी शेतकऱ्यांच्या बांधावर आणि शेतावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली पाहिजे. मात्र, केवळ आश्वासन देऊन भागणार नाही. सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीने प्रत्यक्ष मदत मिळणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. शेतकरी मोठ्या संकटात असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने टँकर सुरू करावेत, नुकसानग्रस्त भागात सरसकट पंचनामे करावेत, शेतमजुरांनाही मदत द्यावी, तसेच पशुधनासाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी चारा छावण्या आणि चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणीही खा. लंके यांनी केली.

> **■ खा. नीलेश लंके यांची स्पष्ट भूमिका**
> **■ दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून बिनविरोधसाठी एकत्र येण्याचे आवाहन**

